सामान्य माणसाने कदाचित इतिहास निर्माण केला नाही म्हणून भूतकालीन वाटचालीत त्याचे काहीच योगदान नाही काय? असा प्रश्न होऊ लागला. आत्तापर्यंतचा इतिहास फक्त प्रभावशाली घटनांची नोंद घेत होता. ज्यांनी इतिहास निर्माण केला एका अर्थाने हा इतिहास आपण वरच्या थरातून अभ्यासतो. या इतिहासातून आपण केवळ प्रभावशाली घटनांची / घटकांची वाटचाल रेखाटतो. सेनापतीचीच नोंद होते त्यांच्या कार्यांचा गाजावाजा होतो यश सुध्दा त्यांच्याच नावे जमा होते. शूर शिपाई मात्र अनुल्लेखाने मारला जातो. विजयाच्या यशात सेनापती नेतृत्व त्याचे डावपेच महत्त्वाचे असतात. तेवढेच किंबहुना त्यापेक्षा जास्त सामान्य सैनिकांनी (subaltern गटाने) गाजवलेला पराक्रम महत्वाचा असतो. आजपर्यंतच्या इतिहासात नेमके याच गोष्टींचे भान इतिहासकारांनी न ठेवल्यामुळे म्हणजेच सामान्यांना दुर्लक्षित ठेवल्यामुळे ह्या सामान्यांचा / वंचितांचा (subaltiern) इतिहास गौण मानला गेला ही भावना प्रकर्षाने जाणवली. पुढील काळात इतिहासाचे डीइलीटायझेशन ची मागणी सुरु झाली आणि इतिहासातील नोंद वरच्या थरातून न घेता सामान्य - अतिसामान्य स्तरावर काम करणाऱ्या पराक्रम गाजवणाऱ्या तळागाळातल्या घटकातून घेतली जावी. असा विचार पुढे येऊ लागला आहे.

History from below असा तो विचार आहे. हा विचार ग्रामची, कनान, चेझनॉक्स, हॉब्सबॉन,चार्ज

रुड इत्यादींनी मांडला.

अभिजनवादी इतिहास लेखनाला नकार देत शोषित - अंकीतांच्या जाणीवेचा अभ्यास सबाल्टर्न इतिहास समुहाने सुरु केला. सबाल्टर्न इतिहासकारांनी अभिजन इतिहास लेखनाच्या ओझ्याखाली दडलेला शोषित - अंकीत जनांचे अनुभव त्यांच्या विवक्षित परंपरा, अस्मिता व जीवनस्तर यामधून उभा राहणाऱ्या त्यांच्या ऐतिहासिक व्यवहाराचा मागोवा घेतला. अर्थात. शोषित - अंकितांच्या जाणीवेचा अविष्कार म्हणून दक्षिण आशियामध्ये कार्यरत असणारे वर्चस्व व प्रभूत्व आणि त्या विरोधातील शोषित - अंकीतांचे उठाव, प्रतिकार व चळवळ यांना केंद्रवर्ती, स्थान देण्यात आले.[७]

रामचंद्र गुहानी - शोषित अंकीत हा आत्मनिष्ठ कर्ता असतो ही भूमिका प्रस्तावित करुन शेतकऱ्यांना त्यांनी बंडाचे कर्ते म्हणून सादर केले. शेतकऱ्यांवर वर्चस्व गाजविणाऱ्या सत्तेच्या प्रतिकारांना उद्वस्त करणे, किंवा त्यांना बळकावणे, ही शेतकरी बंडातील नकाराची रीत गुहा यांनी उलगडून दाखवली. स्थानिक व वसाहतवादी वर्चस्वशाली सत्ता प्रतिकाराचे भंजन शेतकरी करतात. मौखिक व लिखित भाषा अंगविक्षेप, वस्त्र, दळवणवळणाची साधन, गृहसंपत्ती, अशा सर्व बाबीमध्ये उलथापलथ घडवून आणतात. उच्चभ्रूसाठी वापरली जाणारी श्रेष्ठतादर्शक वा आदरवाचक संबोधने यांना फाटा देऊन, शिव्या-शापाच्या द्वारे शेतकरी आपला नकार अभिव्यक्त करतात. लेखनकला हे लबाडी व शोषण करण्याचे शत्रुचे साधन : म्हणून बंडामध्ये, खंडपत्रे,

ISBN : 978-81-925458-5-1

Scanned by CamScanner

करारपत्रे अशी शेतकऱ्यांना बंधनात अडकवणाऱ्या कागदपत्राची होळी करण्यात येते. चांभाराने राजपुताच्या भाषेत बोलणे, बरिया जातीच्या व्यक्तिने पाटीदार (शेतकरी) जातीची पगडी धारण करणे बलाही या निम्न जातीय व्यक्तिने घोड्यावर स्वार होऊन बुंदेलखंडातील गावात फिरणे, जमीनदाराला पाहील्यावर शेतकऱ्याने बाजेवरुन उठून उभे न राहता बसून राहणे, अशा उलट फेऱ्याच्या अनेक वर्तनाचा निर्देश गुहा करतात. शेतकऱ्याच्या प्रतिष्ठेची प्रस्थापना करण्याचा ध्यास केंद्रवर्ती ठेवून उलटफेराची नकारार्थीचा शेतकरी बंडातून कार्यरत असल्याचे गुहाचे विश्लेषन आहे.

संदर्भ :-

१) डॉ. देव प्रभाकर : इतिहास एक शास्त्र पृ.३४६ कल्पना प्रकाशन नांदेड जाने.२००२

२) उमेश बगाडे : इतिहास लेखन मीमांसा-निवडक समाज प्रबोधन पत्रिका-खंड १ (स.प्र.प.& सेंटर फॉर स्टडी इन कल्चर अँड सोसायटी - बंगलोर) पृ.७८ प्रकाशक- प्रकाश विश्वासराव - लोकवाउमय गृह मुंबई - मार्च-२०१०

३) अंतोनिओ ग्रामची : सिलेक्शन फ्रॉम दी प्रिझन नोटबुक्स (xiii-१९६) क्विंटीन होअर व जी. एन. स्मिथ (संपादक)ओरिएंट लॉगमन - दिल्ली. १९९६

४) गुहा रणजीत ऑन अस्पेक्टस् ऑफ दी हिस्टोरियाग्राफी ऑफ कलोनिअल इंडिया (संपादक) सबाल्टर्न स्टडीज रायटींग्ज इन साऊथ एशियन हिस्ट्री एंड सोसायटी ओ.यु.पी. दिल्ली -१९८२- पृ-८

५) उमेश बगाडे : इतिहास लेखन मीमांसा पृ ८०

६) लाल विनय : 'सबाल्टर्न इन दी अकॅडमी : दी हेगेमनी इन हिस्टरी' - हिस्टरी ऑफ हिस्टरी : पॉलिटिक्स अँड स्कॉलरशिप इन मॉडर्न इंडिया, ओ.यु. पी. दिल्ली. पृ १९४-९८

७) ओ हॅनलन रोझालिंड : रिकव्हरिंग दि सब्जेक्ट सबाल्टर्न स्टडीज अँड हिस्टरीज ऑफ रेजिस्टंस इन क्लोनिअल इंडिया - मॉडर्न एशियन स्टडीज (१९८८) पृ. १९५.

उपरोक्त आशय लक्षात घेता भारतातील सबाल्टर्न स्टडीच्या अभ्यासकांनी/ विश्लेषकांनी शोषित - अंकीताच्या जाणीवेतील स्वायत्तपणा अधोरेखीत केला. प्रयोगशिल रितीने नवनव्या अभ्यासपध्दतीचा अवलंब करुन शोषित-अंकीताच्या प्रतिकाराचे विवेचन केले. सबाल्टर्न इतिहास लेखन प्रकल्पाच्या योगदानाची योग्य चिकित्सा करुन शोषित - अंकीता संबंधीच्या इतिहास लेखनाचा प्रवाह असाच विस्तारत गेला पाहीजे.

ISBN : 978-81-925458-5-1

Scanned by CamScanner

७२. जागतिकीकरणाचे महत्व आणि आव्हान/प्रा. झोडगे रामेश्वर सिद्धेश्वर/१६३
७३. पोवाडा : संज्ञा संकल्पना आणि इतिहास परस्पर संबंध/प्रा. डॉ. शारदा कदम/१६६
७४. पुराणवस्तुशास्त्र:एक अभ्यास/प्रा. तांबोळी जावेद चाँदसाहेब/१६८
७५. मानवी हक्क स्वातंत्र्याचे प्रतिक/कदम एन. जी./१७०
७६. स्त्रीवादी इतिहासलेख आणि बदलते प्रवाह/डॉ. वंदना यादवराव कांबळे/१७२
७७. ऐतिहासिक संशोधनातील सहाय्यकारी शास्त्राचे महत्व व उपयोजन/प्रा. केशव अंबादास लहाने/१७५
७८. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात आदिवासी महिलांचे योगदान/प्रा. डॉ. जिरेवाड लक्ष्मीकांत मा./१७८
७९. महाराष्ट्रातील आघाडी सरकारचे ऐतिहासिक पुर्नविलोकन/प्रा.पी.एस.लोखंडे/१८०
८०. करवीर संस्थानातील शैक्षणिक परिस्थिती आणि राजर्षी शाहू माहारज/मलसटवाड संतोष बबनराव/१८२
८१. सबाल्टर्न इतिहास लेखन प्रवाह:एक अभ्यास/प्रा. अनंत दादाराव मरकाळे, प्रा. राजाभाऊ बंकटराव भगत/१८४
८२. निजामकालीन मराठवाड्याच्या संघर्षाचे दर्शन घडविणारी कादंबरी:गावपंढरी/प्रा. मारोती रामराव कोल्हे/१८६
८३. मानवी हक्काचे संरक्षण आणि संवर्धन/प्रा. मोरे मेघा वामनराव/१८८
८४. भारतीय समाज व स्त्री जन्म नकार: एक विश्लेषणात्मक मांडणी/प्रा. कांबळे एम.एस., डॉ. के. सी. केंद्रे/१९१
८५. पर्यटनाच्या दृष्टीने अहमदनगर शहराचे महत्व/प्रा. सय्यद मुजीब मुसा/१९४
८६. पर्यटन उद्योगात ऐतिहासिक स्थळांची भूमिका/नानवटे सिमा बाबाराव/१९७
८७. इतिहास तथा साहित्य:अंत:संबंध/प्रा. बंग नरसिंगराव ओमप्रकाश/१९९
८८. भारतीय संविधान आणि जागतिकीकरण/प्रा.डॉ.बी. एम. नरवाडे/२०२
८९. स्त्रीवादी विचारांचा इतिहास, वैशिष्ट्ये, प्रकार/सौ. देशमुख स्वाती सज्जनराव/२०५
९०. भारतीय वृत्तपत्रांचा इतिहास व प्रगती/प्रा. सुदर्शन उद्धवराव स्वामी/२०८
९१. समाज सुधारणा चळवळीचा इतिहास/प्रा. सुर्यवंशी विश्वनाथ माधवराव/२१०
९२. Globalization in Indian Economy/Dr. Suryawanshi V.M./212
९३. कोटीतीर्थचे शिल्पवैभव/प्रा. सुभाष रामराव रगडे/२१५
९४. इतिहास संशोधन पद्धती/प्रा. सिसोदिया प्रदिप बन्सीधरराव/२१८
९५. शिवकालीन लष्करी व्यवस्था/प्रा. शोभा सुभाष मिसाळ/२२१
९६. भारतीय इतिहासातील पर्यावरण संवर्धनाच्या परंपरा व विचार/प्रा. जाधव शिवराम गोविंदराव/२२४
९७. मुलभुत संकल्पना/जाधव सत्यभामा, डॉ. पाटील स्वाती/२२७
९८ स्त्री चळवळीचा इतिहास/शेटे स्वप्ना अविनाशराव/२२९
९९ विसाव्या शतकातील नव मार्क्सवादी प्रवाह/प्रा. डॉ. साबणे ए. जी./२३१
१००. समाजपरिवर्तनामध्ये स्त्रियांची उल्लेखनिय भूमिका-मध्ययुगीन व आधुनिक/रेखा राऊत/२२३
१०१ सबाल्टर्न स्टडीज आणि भारतीय इतिहासा लेखनातील मंथन/डॉ. राजेंद्र धाये, डॉ. प्रभाकर मिरकड/२३५
१०२. स्त्रीवादी विचार प्रवाह व सामाजिक परिवर्तन/प्रा. रेवणनाथ भिका काळे/२३८
१०३. स्त्रीवाद आणि स्त्रीयांचा राजकीय सहभाग/प्रा. रत्नपारखे शिवशंकर अशोकराव/२४१
१०४. स्त्रीवाद आणि भारतातील स्त्री चळवळीचा इतिहास : एक समाजशास्त्रीय अध्ययन:प्रा नागर्थवार दिगांबर राजन्ना/२४४

Scanned by CamScanner

RELEVANCE OF GANDHIAN THOUGHTS AT PRESENT TIME

(Vol. 1)

Guide
Dr. Gopalrao B. Sondge
Principal
Shivaji College, Hingoli (MS)

Editor
Dr. Sudhir G. Wagh
Director,
Gandhian Studies Center &
HOD Hindi, Shivaji College, Hingoli (MS)

Co- editor
Kishor N. Ingole
Asst. Prof. , Dept. of English
Shivaji College, Hingoli (MS)

NEW MAN
PUBLICATION
www.newmanpublication.com

Scanned by CamScanner

Relevance of Gandhian Thoughts at Present Time *(Vol. 1)*
© Principal, Shivaji College, Hingoli (MS)

ISBN: 978-93-83871-62-9
First Published: March, 2015.

Price: Rs. 295/-

Printed & Published by
Dr Kalyan Gangarde
For New Man Publication
108, Brahma Apartments,
Nr. Dattadham, Parbhani - 431401
Email: nmpublication@gmail.com
Web: www.newmanpublication.com

Mob. 9420079975

Type Setting & Cover Designing
Dr Kalyan Gangarde & Seema Gangarde

Disclaimer: Articles in this book do not reflect the views or policies of the Editors or the Publisher. Respective authors are responsible for the originality of their views / opinions expressed in their articles / papers.

Scanned by CamScanner

४०

महात्मा गांधीजींचे अस्पृश्यतेविषयी विचार

- डॉ.राजेंद्र धाये
सहयोगी प्राध्यापक आणि
इतिहास विभागप्रमुख,
संत रामदास महाविद्यालय,
घनसांवगी, जि. जालना.

भारतात फार पूर्वीपासून अस्पृश्यता अस्तित्वात आहे. अस्पृश्यतेच्या उगमा संदर्भात विद्वानांमध्ये एकवाक्यता नसली तरी वेदकालापासून अस्पृश्यतेची बिजांकुर सापडतात. अस्पृश्यतेचा उगम चातुर्वर्ण्यजाती संस्थेशी निगडीत असून तिचा उगम सूडाच्या भावनेतून झालेला असावा. एक मात्र, निश्चित की, 'अस्पृश्यता' ही भारतीय हिंदू समाजाला पिढ्यान्पिढ्या लागलेली सामाजिक कीड असून देशाच्या प्रगतीमधील हा फार मोठा अडसर आहे. अस्पृश्यतेमूळे माणुसकीची पायमल्ली होऊन सामाजिक विषमता वाढली. अस्पृश्यतेच्या गुलामगीरीमुळे येथील एक वर्ग सामाजिकदृष्ट्या हिन बनला आणि संस्कृती व प्रगतीच्या प्रवाहापासून तो बाहेर फेकला गेला.

विसाव्या शतकाने जगाला चार महान क्रांतीकारक दिले. लेनिन, माओ, गांधी आणि आंबेडकर. चारही नावे एका दमात घेणे जरा आपल्याला अवघड जाईल; पण आपल्याला आपला दमसांस वाढवावा लागेल. ही चारही नावे एकत्र घेणे आपल्याला कदाचित खटकेल; पण आपल्या मनाचे बंद दरवाजे आपल्याला उघडावे लागतील. लेनिन आणि माओने वर्गीय शोषणाच्या विरोधात व्यवस्था परिवर्तनाचा क्रांतीकारी व्यवहार सिध्द केला तर, आंबेडकर आणि गांधींनी वर्गीय शोषणाशी संघर्ष करीत असताना बिगरवर्गीय शोषधाच्या संरचनाबाबतही तितकेच भान जागे केले. गांधींचा वंशवाद विरोधी व अस्पृश्यविरोधी संघर्ष आणि आंबेडकरांचा जातीव्यवस्थाविरोधी संघर्ष याची साक्ष देतात.[१] म. गांधी हे भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील सेनानी. त्यांचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील कार्य महत्वपूर्ण असले तरी या देशातील आर्थिक व सामाजिक प्रश्ना संदर्भातही त्यांनी आपले विचार मांडले. त्यांनी अस्पृश्यतेच्या संदर्भातील घेतलेली भूमिकाही महत्वाची आहे.

म. गांधीजींनी जगाला मानव मुक्तीचे तत्वज्ञान दिले. जात, वर्ण आणि अस्पृश्यतेची जाणीव त्यांना दक्षिण आफ्रिकेतच झाली होती. त्यांना दक्षिण आफ्रिके तच वर्ण संघर्षाला सामोरे जावे लागले होते. दक्षिण आफ्रिकेतून भारतात परत आल्यानंतर म.

Scanned by CamScanner

गांधींना येथील गुंतागुंतीच्या सामाजीक परिस्थितीची जाणीव झाली. भारतीय समाजातील स्पृश्य, अस्पृश्य, उचनीच, स्त्री-पुरुष, गरीब श्रीमंत इत्यादी भेदाची त्यांना प्रकर्षाने जाणीव झाली. भारतीय समाजाला एकसंघ करावयाचे असेल तर येथील अमानवी रुढी परंपरा नष्ट केल्याशिवाय पर्याय नाही हे त्यांनी जाणले. धर्मशास्त्र आणि धर्मग्रंथाविषयी त्यांच्या मनात आदरभाव असला तरी भारतीय समाजव्यवस्थैत अस्तित्वात असलेल्या अस्पृश्यतेच्या संदर्भातील धर्मशास्त्रातील भूमिका तर्क व नितीमत्तेला धरुन नाहीत असे त्यांचे ठाम मत होते. अस्पृश्ता ही हिंदू धर्माशी विसंगत आहे अशी भूमिका गांधीजींनी मांडली होती.

दक्षिण आफ्रिके तून भारतात आल्यानंतर इ.स. १९२०-२१ पासून म. गांधींनी अस्पृश्यते विषयीचे आपले विचार मांडण्यास सुरुवात केली. अस्पृश्यते विषयी यंग इंडियाच्या १९ जानेवारी १९२१ च्या अंकात म. गांधी लिहितात की, 'अस्पृश्यता ही धर्माने मान्य केलेली बाब नव्हे, ती सैतानी करामत आहे. सैतानाने नेहमीच धर्मग्रंथांना उद्धृत केले आहे. पण धर्मशास्त्रांच्या ग्रंथांचे स्थान कधीच बुध्दी आणि सत्य यांच्या वरचे असू शकत नाही. त्याचा उद्देश बुध्दी शुध्द करणे व सत्याला प्रकाशित करणे हा असतो. वेदांनी तसा उपदेश केला असेल, हरकत घेतली नसेल, यज्ञाला मान्यता दिली असेल, असे असेल तरीही मी कोण्या उत्तम अश्वाची यज्ञात कदापि आहुती देणार नाही. वेद हे दैवी व अलिखित आहेत असे मी मानतो. केवळ अक्षरज्ञान मारक ठरते, परंतु त्यामागील सारतत्व असते, ते प्रकाश दाखविते आणि वेदांचे सार म्हणजे निर्मलता, साथ, निष्पापता, पवित्र्य, नम्रता, साधेपणा, क्षमाशीलता, ईश्वरीय शक्ती इ. अनेक गुण हे आहे आणि स्त्रिपुरुषांना द्विव्यभव्य व शूरवीर बनविणारे आहे. पण आपल्या राष्ट्रातील थोर आणि न कुरकुरणाऱ्या सफाई कामगारांना कुत्र्यापेक्षाही निकृष्ट दर्जाची वागणूक देऊन त्यांच्यावर थुंकून त्यांचा तिरस्कार करणे, यात कुठलाही मोठेपणा किंवा शौर्य कदापि नाही हे लक्षात घ्यायला हवे.'[२] म. गांधीजी अस्पृश्यतेबद्दलची आपली भूमिका परखडपणे मांडतात. ते म्हणतात, अस्पृश्यता हा हिंदू धर्मावरील मोठा कलंक आहे. ती स्मरणातीत कालापासून चालत आली आहे हे मला मान्य नाही. आम्ही जेंव्हा अधःपतनाची परिसीमा गाठली असेल त्याकाळी तिचा उदय झाला असावा असा माझा समज आहे. हा एक भयंकर अभिशाप आहे आणि तो जोवर कायम राहील तोवर या भूमीत आम्हाला जे जे सहन करावे लागत आहे ते आम्ही आमच्या अपराधाबद्दल दंड म्हणून मानणेच योग्य होईल.[३] अस्पृश्यतेचे खऱ्या अर्थाने पूर्णपणे निर्मूलन झाले तर हिंदू धर्मावरचा भयानक असा कलंक धुऊन निघेल, इतकेच नव्हे तर या घटनेचे पडसाद जगात सर्वत्र उमटल्याखेरीज राहणार नाहीत. अस्पृश्यतेविरुध्द माझा जो झगडा आहे तो मानवी जीवनातील अशुध्दता, अमानुषता निपटून काढण्यासाठी चालू केलेला झगडा आहे.[४] गांधीजींच्या या

Scanned by CamScanner

उक्तीवरुन त्यांना या प्रश्नाचे (अस्पृश्यतेचे) गांभीर्य किती यथातथ्यपणे जाणवले होते ते समजते.

अस्पृश्यता हा हिंदुत्वास लागलेला एक कलंक आहे. ती पूर्णपणे नष्ट करणे ही हिंदूंचीच जबाबदारी आहे. जोपर्यन्त आपण आपल्याच लोकांवर स्पृश्यास्पृश्य भावातून वर्चस्व गाजवितो तोपर्यन्त ब्रिटीशांच्या विरोधात बोलण्याचा आपल्याला नैतिक अधिकार नाही,[५] असे गांधीजी म्हणत असत. आज ज्या स्वरुपात अस्पृश्यता हिंदू धर्मात विद्यमान आहे त्या स्वरुपात ती ईश्वर आणि मानवाविरुध्द होणारा घोर अपराध असून हे विष हिंदू धर्माला हळूहळू निर्जीव करीत आहे. शास्त्रांचा संकलित विचार केल्यास त्यात अस्पृश्यतेचे समर्थन आढळणार नाही असे मला वाटते. शास्त्रांत एका हितकारी अस्पृश्यतेचा जरुर उल्लेख आहे, आणि तसा तो सर्व धर्मांतून आढळतो. ती अस्पृश्यता स्वच्छतेच्या नियमांच्या पालनाचा भाग आहे. ती नेहमीच राहणार. पण भारतात आज जी अस्पृश्यता आहे ती भयंकर आहे आणि तिची प्रांतोप्रांती, किंबहूना जिल्हानिहाय अनेक रुपे आहेत. तिने स्पृश्यास्पृश्य दोघांचे अध:पतन केले आहे. कोट्यवधींचा विकास अडवून धरला आहे. त्यांना जीवनातील साध्या सोयीही उपलब्ध नाहीत. अतएव या अनिष्टाचे जितक्या लवकर उच्चाटन होईल तेवढेच ते हिंदूधर्म, भारत आणि कदाचित अखिल मानवजातीलाही उपकारक ठरेल.[६] असे गांधीजींना वाटत होते. गांधीजी अस्पृश्यतेचा प्रश्न स्वराज्य प्राप्तीशी जोडताना म्हणतात की, 'जोपर्यन्त अस्पृश्यता ही हिंदू धर्माचा भाग आहे, असे स्वत:हून हिंदू मानतात; तसेच जोपर्यन्त आपल्या एका वर्गाच्या बंधूंना स्पर्श झाल्याने पाप केले असे जे हिंदू विचार करतात, तोपर्यन्त स्वराज्यप्राप्तीची आवश्यकताच का आहे?[७] गांधीजी म्हणतात की, 'माझे अस्पृश्यतेबद्दलचे विचार हे काही माझ्या पाश्चात्य शिक्षणाचा परिपाक नव्हे, माझे हे विचार इंग्लंडला जाण्यापूर्वीच पक्के झाले होते व धर्मशास्त्रग्रंथांचा अभ्यास करण्याच्या कितीतरी आधी अशा स्थितीत ही जडणघडण झाली होती, की जेंव्हा असे विचार करण्यास वातावरण मुळीच अनुकूल नव्हते. तेंव्हापासून माझे ते विचार होते कारण मी एका सनातनी वैष्णव कुटूंबात जन्मलो आणि मला कळू लागल्यापासूनच या प्रश्नांबाबत कुणाशीही तडजोड न करता मी निर्णायात्मक मते बनविली होती. तीच मते पुढे हिंदू धर्मशास्त्राचा तुलनात्मक अभ्यास केल्यानंतर आणि स्वत: या अनुभवाच्या आधारावर अधिक पक्की झालीत. कुठल्याही धर्मशास्त्रांत या पाचव्या वर्णाचा उललेख नाही, हे सत्य असून देखील व गीतेत ब्राम्हण व भंगी (सफाई कामगार) हे समान माना असा स्पष्ट आदेश असताना देखील आपण लोक हिंदू धर्मावरील असलेला व खोलवर रुजलेला हा अस्पृश्तेचा कलंक अजुनही का टिकवून धरीत आहोत हे मला काही उमजत नाही. ब्राम्हण व भंगी समान आहेत असे म्हणण्यात जो गुणांनी खरा ब्राम्हण असेल त्याचा तुम्ही योग्य आदर करणार नाही असे नाही. त्याचा अर्थ असा की ब्राम्हण आणि भंगी

Scanned by CamScanner

यांना पण समान सेवेचा हक्क आहे. म्हणजे भंग्याला देखील आपल्या मुलाला चांगल्या शाळेमध्ये शिक्षण देण्याचा अधिकार आहे. सार्वजनिक मंदिरे त्यांच्यासाठी खुली करणे, सार्वजनिक विहिरींचा वापर करण्याची मुभा देणे इत्यादी अधिकार जे इतर हिंदूंना उपभोगता येतात, ते सर्व उपभोगण्याचा अधिकार त्यांनाही (भंगी, अस्पृश्य) मिळालाच पाहीजे.'[८] म. गांधी स्वतःला एक सनातनी हिंदू धर्मिय मानीत. असे असले तरी हिंदू धर्मातील अस्पृश्यता त्यांना मान्य नव्हती.

'मी भंगी आहे, सूत कातणारा विणकर आहे',अशी स्वतःची ओळख गांधी नेहमी सांगत. ही त्यांची शूद्रातिशूद्र वर्गांशी असलेली तादात्म्यता आहे. स्वतःला अस्पृश्य म्हणून संबोधताना गांधींना कोणतीही दांभीकता वा आढ्यता दाखवायची नव्हती. कच्छमधील एका दौऱ्यात त्यांनी याविषयीचा खुलासा केला आहे. ते म्हणतात, ''मी स्वतःला एक अस्पृश्य, भंगी म्हणून संबोधीत आलो आहे ते काही आढ्यतेने नव्हे वा अज्ञानाने नव्हे; तसेच मी पाश्चात्य विद्याविभूषित आहे म्हणूनही नव्हे; तर त्यामुळे त्यांची सेवा मला चांगली करता यावी म्हणून.'' (डॉ.यशवंत सुमंत)[९] या त्यांच्या उद्गारात कोठेही दांभिकता नाही. प्रतिनिधीत्वाचा दावा नाही. दावा आहे तो सेवेचा, सेवेच्या माध्यमातून त्यांच्यापर्यन्त पोहचण्याचा. पोहचण्यातून त्यांच्याशी एकरुप होण्याचा व त्यांचे शोषण अनुभवण्याचा ! हे अनुभवणे हे केवळ एक थरारक अनुभव घेण्यासाठी नव्हे; तर त्या वेदनेतून कार्यप्रवण होण्यासाठी आणि तरीही या अनुभव घेण्यास मर्यादा ओहतच असे गांधी म्हणतात. अस्पृश्यतेबद्दलची मं. गांधीची तळमळ यातून स्पष्ट होते.

त्यापूढेही जाऊन मं. गांधीजी असे म्हणतात की, 'मला पुनर्जन्म नको आहे. पण यायचाच झाला तर तो अस्पृश्य जातीत यावा. म्हणजे मला त्यांच्या व्यथावेदनांचा प्रत्यक्ष अनुभव मिळेल, आणि अस्पृश्यतानिवारणाचे कार्य मला अधिक कसोशीने व परिणामकारकतेने करता येईल.'[१०] मी एकवीस वर्षाचा झालो तेंव्हा माझा इतर सर्व धर्माचाही अभ्यास झाला होता. माझ्या आयुष्यात एक काळ असा होता की हिंदू धर्म व ख्रिश्चन धर्म या दोहोंच्या हिंदोळ्यावर माझे मन हेलकावीत होते. परंतु जेंव्हा माझ या मनाने समतोल गाठला, तेंव्हा मला आढळून आले की, मला जर मोक्षप्राप्ती हवी असेल तर ती फक्त हिंदू धर्मानेच मिळू शकेल आणि त्यानंतर माझी हिंदू धर्मावरील श्रध्दा अधिकच प्रगाढ व ज्ञानमय होत गेली. परंतु असे असुनही माझी ही धारणा आहे की अस्पृश्यता ही हिंदू धर्माचा भाग नाही, आणि जर तसे असेल तर मग असा हिंदू धर्म मला नको, हे खरे आहे की, अस्पृश्यता हे पाप आहे असे हिंदू धर्म मानीत नाही. शास्त्रांच्या भाष्यांबद्दल व अर्थ लावण्याबाबत मी कोणत्याही वादात पडू ईच्छित नाही. माझा मुद्द स्पष्ट करण्यासाठी भागवत अथवा मनुस्मृतिच्या दाखल्यांचा उपयोग करुन

Scanned by CamScanner

विशद करणे मला कदाचित फार जड जाईल. परंतु माझा असा दावा आहे की, मी भावना जाणून चुकलो आहे. अस्पृश्यतेला मान्यता देऊन हिंदू धर्माने एक पाप केले आहे. त्यामुळे आपले भयंकर अधःपतन झालेले आहे. आणि ब्रिटीश साम्राज्यतही आपल्याला हिन दर्जा मिळाला आहे. मुसलमानांना सुध्दा आपल्या संगतीने या रोगाची लागण झाली आहे. आणि दक्षिण आफ्रिका, पूर्व आफ्रिका व कॅनडा येथील मुसलमान देखील हिंदू प्रमाणेच निकृष्ट जात मानू लागलेत. हा सारा दुष्परिणाम अस्पृश्यतेच्या पापातून उद्‌भवला आहे.[११] गांधीजी स्वतःला सनातनी हिंदू म्हणवून घेत. असे असले तरी हिंदू धर्माच्या नावावर ज्या अनेक वाईट गोष्टी केल्या जातात त्यांना ते नाकारत होते.

म. गांधीजी ६ आक्टोंबर १९२१ च्या यंग इंडियाच्या अंकामध्ये लिहितात की, 'तुमची जी श्रध्दा असेल किंवा तुमचा जो धर्म असेल, त्यानुसार तुम्ही ईश्वराची उपासना करा असे हिंदू धर्म सांगतो, त्यामुळे तो सर्व धर्मासोबत सलोख्याने, शांततेने राहू शकतो. अशा प्रकारची माझी हिंदू धर्माची संकल्पना असल्यामूळे मला हिंदू धर्मातील अस्पृश्यतेशी कधीही जुळवून घेता आले नाही, मी सदैव ती एक बांडगुळासारखीच मानली. आपल्याकडे अस्पृश्यता पिढ्यानपिढ्या चालत आली आहे हे खरे आहे. परंतु तशा आणखी कितीतरी वाईट चालीही आपल्याकडे आजतागायत चालत आलेल्या आहेत. मुली देवाला अर्पण करुन त्यांना वेश्याव्यवसायाला प्रवृत्त करण्याच्या चालीला हिंदू धर्माचे अंग म्हणवून घेताना मला अत्यंत लाज वाटते. तरीही ही चाल हिंदूस्थानच्या काही भागात आजही प्रचलित आहे. कालीमातेला बकऱ्याचा बळी देणे ही गोष्टी मी ठामपणे अधर्म मानतो, आणि ते हिंदू धर्माचे अंग आहे असे मुळीच मानीत नाही. हिंदू धर्म हा अनेक शतकांपासून विकसित होत असलेला धर्म आहे. खुद्द 'हिंदू धर्म' हे नाव देखील परकीयांनी हिंदुस्थानात राहणाऱ्या लोकांच्या धर्माला दिलेले आहे. एकेकाळी धर्माच्या नावावर प्राण्यांचा बळी दिला जात असे हे खरे आहे. पण तो धर्म नव्हे, हिंदू धर्म तर नव्हेच नव्हे आणि मला असेही वाटते की, गाईचे सरंक्षण करणे हा जेंव्हा पूर्वजांनी धर्म मानला, तेंव्हा गोमांस खाणाऱ्यांवर त्यांनी बहिष्कार टाकला असला पाहिजे. आपसातील यादवीचा हा झगडा फार भयंकर झाला असला पाहिजे. केवळ समाजाला न जुमानणाऱ्यांवर हा सामाजिक बहिष्कार घातला गेला असे नव्हे तर त्यांच्या पापाचे परिणाम त्यांच्या मुलाबाळांनाही भोगावे लागले असे दिसते. जी रुढी सद्‌हेतूने अंमलात आणण्याचा प्रयत्न केला गेला ती पूढे भलतीच घट्ट झाली आणि हिंदू धर्मग्रंथांत त्या रुढीला कायम करणारे श्लोकही शिरलेत. अशारीतीने त्या रुढीला शाश्वत करण्याकडे कल होऊ लागला, जो सर्वथा अनुचित व अन्यायकारक होता. माझे हे विवेचन चूक असो की बरोबर असो, पण अस्पृश्यता ही बुध्दीला मुळीच न पटणारी आणि दया, करुणा आणि प्रेम या उपजत भावनांच्या विरोधी आहे. जो धर्म गाईची पूजा करण्यात प्रतिष्ठा

Scanned by CamScanner

मानतो, तो माणसाशी निष्ठूर वागेल, मनुष्यप्राण्यावर अमानुष बहिष्कार टाकेल किंवा ते योग्य मानील हे शक्य वाटत नाही. माझ्या शरीराचे तुकडे तुकडे करुन मला ठार मारणे मी आनंदाने पत्करेन. तरीही मी अस्पृश्यांनां कधीही दूर लोटणार नाही. जर हिंदूंनी आपल्या दिव्य धर्माला लागलेला अस्पृश्यतेचा कलंक कायमचा मिटविला नाही तर ते स्वातंत्र्य प्राप्तीला योग्य समजले जाणार नाहीत व त्यांना कधी स्वातंत्र्य मिळणार नाही. मी हिंदू धर्मावर प्राणापेक्षाही अधिक प्रेम करीत असल्याने मला या अस्पृश्यतेच्या कलंकाचा भार असह्य होऊ लागला आहे.'[१२] प्राचीन आहे, सबब अस्पृश्यतेला असू द्या असे म्हणता येणार नाही. एखाद्या काळी एखाद्या अपराधाबद्दल शिक्षा म्हणून कोणावर अस्पृश्यता लादण्यात आली असेल असे म्हटले तरी अजुनही त्यांच्या वंशजांना सदर शिक्षा भोगावयास लावण्याचे काहीही कारण नाही. खुद्द अस्पृश्यांत पुनः अस्पृश्यतेचे पापुद्रे आहेत. त्यावरुन एवढेच सिध्द होते की एखादी वाईट प्रथा सुरु झाली म्हणजे तिला पायबंद घालणे दुरापास्त असते. यामुळे तर सुसंस्कृत हिंदू समाजाने हा अभिशाप शक्य तेवढ्या ताबडतोब झटकून मोकळे झाले पाहिजे. जनावराला मारणे आणि मांस, रक्त, हाडे, मल यांच्या संपर्कामूळे जर अस्पृश्य ठरत असतील तर प्रत्येक नर्स, डॉक्टर यांनाही अस्पृश मानणे भाग पडेल. एवढेच कशाला ! मांसाहार करणाऱ्या व जनावरांचा बळी देणाऱ्या ख्रिस्ती, मुसलमान आणि खुद्द हिंदूतील तथाकथीत उच्चवर्णीयांनाही अस्पृश्य मानावे लागेल.[१३] म. गांधींनी अस्पृश्यते बद्दल आपले विचार परखडपणे मांडले. हिंदू धर्मातील उणीवा दाखवण्यासही त्यांनी मागेपूढे बघीतले नाही. अस्पृश्यतेसारख्या रुढीला चिकटून बसल्यामुळे त्यांनी हिंदूवर दोषारोप ठेवला आणि ही दुष्ट प्रथा हिंदूंनी हद्दपार करावी म्हणून त्यांनी हिंदूना अर्जवाही केली.

सारांश :

म.गांधींनी अस्पृश्यतेच्या विरुध्द जीवनभर संघर्ष केला. म. गांधी दक्षिण आफ्रिकेत असतानाच त्यांना अस्पृश्यतेचा अनुभव आला होता. वर्णद्वेषातून त्यांनाही अपमानित व्हावे लागले होते. त्यांनी भारतात परतल्यानंतर अस्पृश्यतेवर आपली मत स्पष्टपणे मांडली. त्यांनी अस्पृश्यतेच्या संदर्भात मांडलेल्या मतांमूळे भारतीय समाजाला अस्पृश्यतेची जाणीव प्रखरतेने झाली. भारतीय धर्मव्यवस्थेतील अस्पृश्यता किती अन्यायी आहे, त्यामुळे अस्पृश्यांची अवस्था किती दयनीय झालेली आहे. सवर्ण समाज अस्पृश्यतेच्या नावाखाली अस्पृश्यांना किती वाईट व अपमानास्पद वागणूक देत आहे, अस्पृश्यांना जीवन जगणेही कसे कठिण झाले आहे हे म. गांधीजींना समजले होते. अस्पृश्यांची ही वाईट परिस्थिती बदलायची असेल तर ही अस्पृश्यतेची परंपरा किती वाईट आणि हिंदू धर्मावरील कलंक आणि हिंदू हिंदूंसाठी कशी अपमानकारक आहे हे त्यांनी येथील सनातनी हिंदू धर्मीयांना अस्पृश्यतेवर आपले

Scanned by CamScanner

परखड विचार मांडून स्पष्ट करण्याचा प्रयत्न जीवनभर केला. अस्पृश्य सुध्दा आपल्यासारखेच हाडामासाची माणसे आहेत, त्यांनाही जगण्याचा अधिकार आपणांसारखाच आहे, त्यांना आपण आपल्या बंधू प्रमाणे वागवावे असे गांधीजी सतत सांगत राहीले.

थोडक्यात येवढेच म्हणावे लागेल की, अस्पृश्यता ही हिंदू धर्माला लागलेली किड असून तिने एका वर्गाला अतिशय अपमानास्पद व अमानवी जीवन जगायला भाग पाडले. तिचा उगम हा सूडाच्या भावनेतूनच झाला असावा असे म्हटले तर गैर होणार नाही.

संदर्भ :

१) प्रा. सोनुने यशवंत (संपादक), मंथन, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती एप्रील-२००७, पृ.क्र. १८.

२) महात्मा गांधी, अनुवाद तारा धर्माधिकारी, हिंदू धर्म म्हणजे काय ? , नॅशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडिया, दिल्ली, चौथी आवृत्ती, २००९, पृ.क्र. ९४.

३) महात्मा गांधी, माझ्या स्वप्नांचा भारत (संक्षिप्त), परंधाम प्रकाशन, पवनार (वर्धा), पाचवी आवृत्ती, ऑगस्ट २००७, पृ.क्र. ७८.

४) सरदार गं.बा., गांधी आणि आंबेडकर, सुगावा प्रकाशन, पुणे, पुनर्मुदण २० जुलै २००४, पृ.क्र. ६३.

५) प्रा.डोळस अविनाश व इतर, सामाजिक परिवर्तन आणि सामाजिक चळवळी, पुस्तक ३, ग्रंथनिर्मिती केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक, प्रथम प्रकाशन, एप्रिल २००२, पृ.क्र. १००.

६) महात्मा गांधी, उपरोक्त, पृ.क्र. ७८-७९.

७) खरात शंकरराव, अस्पृश्यांचा मुक्तीसंग्राम, इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे, तृतीय आवृत्ती २५ जून २००९, पृ.क्र. ७५.

८) महात्मा गांधी, अनुवादक तारा धर्माधिकारी, उपरोक्त, पृ.क्र. ९५.

९) प्रा. सोनुने यशवंत (संपादक), उपरोक्त, पृ.क्र. ३०.

१०) सरदार गं.बा., उपरोक्त, पृ.क्र. १५.

११) महात्मा गांधी, अनुवादक तारा धर्माधिकारी, उपरोक्त, पृ.क्र. ९२-९३.

१२) कित्ता, पृ.क्र. ७-८.

१३) महात्मा गांधी, उपरोक्त, पृ.क्र. ७९.

❑❑❑

Scanned by CamScanner

महाराष्ट्रातील स्वातंत्र्य चळवळी

डॉ. के.डी. ढेकणे

Scanned by CamScanner

अथर्व पब्लिकेशन्स्

महाराष्ट्रातील स्वातंत्र्य चळवळी
Maharashtratil Swantantrya Chalvali

© सुरक्षित

ISBN : 978-93-85026-07-2

प्रकाशक
युवराज भटू माळी

अथर्व पब्लिकेशन्स्
धुळे १७, देवीदास कॉलनी, वरखेडी रोड,
धुळे - ४२४००१.
संपर्क ९४०५२०६२३०
जळगाव तळमजला, ओम हॉस्पिटल,
अँग्लो उर्दू हायस्कूलजवळ, ढाके कॉलनी,
जळगाव - ४२५००१.
संपर्क ०२५७-२२३९६६६, ९७६४६९४७९७
ई-मेल atharvapublications@gmail.com
वेबसाईट www.atharvapublications.com

प्रथमावृत्ती
१८ मार्च २०१५

अक्षरजुळवणी
अथर्व पब्लिकेशन्स्

मुखपृष्ठ
विशाल लोहार

मूल्य
₹ ३५०/-

टीप : या पुस्तिकेत प्रसिद्ध झालेले लेख त्या त्या संबंधित लेखकांच्या व्यक्तिगत मतांवर आधारित आहेत. संपादक/मुद्रक/प्रकाशक या मतांशी सहमत असतीलच असे नाही.

श्री.एस.एस. पाटील कला, श्री. भाऊसाहेब टी.टी. साळुंखे वाणिज्य आणि श्री.जी.आर. पंडीत विज्ञान महाविद्यालय,जळगाव. (नूतन मराठा महाविद्यालय, जळगाव) महाराष्ट्रातील स्वातंत्र्य चळवळी याविषयावर झालेला राष्ट्रीय परीषदेतील लेखांचे संकलन

Scanned by CamScanner

अनुक्रमणिका

- **हैदराबाद स्वातंत्र्यसंग्रामातील बीड जिल्ह्याचे योगदान** ११
  - प्रा. सावंत के. डी.
- **हैद्राबाद मुक्ती संग्राम** १४
  - प्रा. अनिल प्रभाकर निकम
- **हैद्राबाद मुक्ती संग्राम** १७
  - प्रा. डॉ. दुधभाते फुलचंद सुर्यभान
- **हैद्राबाद मुक्तीसंग्रामात दलितांचे योगदान** २०
  - प्रा. डॉ. प्रभाकर मिरकड
  - प्रा. डॉ. राजेंद्र धाये
- **औरंगाबाद जिल्ह्यातील जंगल सत्याग्रह** २३
  - प्रा. एस. के. कदम
- **हैदराबाद मुक्ती संग्रामात औरंगाबाद जिल्ह्याचे योगदान** २६
  - डॉ. के. डी. ढेकणे
- **हैद्राबाद मुक्तीसंग्रामात महिलांचे योगदान** २९
  - प्रा.जयश्री रा.सांळुके
- **हैद्राबाद मुक्ती संग्राम** ३५
  - प्रा.दिलीप गुलाब तडवी
- **हैदराबाद संस्थानातील स्वातंत्र्य चळवळ** ३८
  - प्रा.शेख अनिसुद्दीन अल्लाउद्दीन

- **१८५७ च्या स्वातंत्र्य लढ्यातील नाशिक जिल्ह्यातील आदिवासींचा सहभाग** ४०
  - डॉ.पल्लवी ठाकूर
- **पेठ संस्थानातील स्वातंत्र्य लढा** ४८
  - प्रा. बोरसे रमेश रामदास
- **विंचूर संस्थानचे वि.शि.विंचूरकराचा अशेरी संघर्ष** ५१
  - प्रा. भोंग रामदास गुंडिबा
  - प्रा.डॉ.वाघ डी.एन.
- **निफाड तालुक्यातील स्वातंत्र्य चळवळ** ५४
  - प्रा. छाया भास्कर भोज
- **ऑगस्ट १९४२ चा महाराष्ट्रातील भडाग्नी** ५७
  - अनिल साहेबराव पाटील
  - प्रा. इंदिरा अशोक लोखंडे
- **स्वातंत्र्य आंदोलनात विदर्भातील झेंडा सत्याग्रह** ६३
  - प्रा.डॉ. नामदेव वा. ढाले

Scanned by CamScanner

हैद्राबाद मुक्तीसंग्रामात दलितांचे योगदान

प्रा. डॉ. प्रभाकर मिरकड । प्रा. डॉ. राजेंद्र धाये

इ.स.१९४७ मध्ये भारतातून इंग्रज निघून गेल्यावर हैद्राबादचे निजाम आपले संस्थान भारतात विलीन करतील असे वाटले होते. पण त्यांनी स्वतंत्र, सार्वभौम मुसलमानी राज्य चालविण्याचा मानस व्यक्त केला.[१] भारत स्वतंत्र झाला त्यावेळी भारतात ५८० संस्थाने होती. यापैकी हैद्राबाद संस्थान वगळता बाकी सर्व संस्थाने भारतात विलिन झाली पण हैद्राबाद संस्थानचे नवाब मीर उस्मान अली खॉ बहादूर निजाम यांनी स्वतंत्र राहण्याचे ठरवले व भारत स्वतंत्र झाल्यावर तशी घोषणा केली.[२] हैद्राबाद संस्थान हे भारतात स्वतंत्र राहील या निजामाच्या घोषणेला संस्थानातील रझाकार संघटनेने समर्थने दिले. या संघटनेचा प्रमुख लातुरचा कासीम रझवी याने या रझाकारी संघटनेला सशस्त्र व आक्रमक बनविले होते.

इंग्रजांनी भारतातून जाताना भारत आणि पाकिस्तान ही दोन वेगवेगळी राष्ट्रेच निर्माण केली असे नव्हे तर त्याचबरोबर त्यांचे मांडलिक असलेल्या ५८० संस्थानिकांना जाताना त्यांनी स्वतंत्र आणि सार्वभौम केले. नव्या सरकारला जातीयवाद, संस्थानिकांचे प्रश्न आणि पाकिस्तान या साऱ्या प्रश्नांनी घेर्निं भंडावून सोडावे ही नीती हे स्वातंत्र्य बहाल करताना होती.[३] सातव्या निजामाच्या काळात अन्यायाचा कळस झाला होता. मीर उस्मान अली खानची सत्तेची महत्वाकांक्षा अतिशय खालच्या थराला गेली होती. त्याने स्वत:च आपल्या आसफजाही घराण्याच्या व राज्याच्या रक्षणासाठी प्रार्थना करणारे एक कवन इ.स. १९१२ मध्ये रचले, खास गॅझेटद्वारे ते प्रसिद्ध केले. हे कवन फारसी होते. त्याचे उर्दूमध्ये भाषांतर करवून घेतले व राज्यातील सर्व शाळांमधून हे कवन प्रार्थना म्हणून म्हणावे असा हुकूम काढला.[४] आसफजाही घराण्याची सत्ता चिरंजीव राहावी यासाठी सर्व जातीधर्मांच्या मुलांना ही प्रार्थना म्हणावी लागत असे. त्याचबरोबर गणवेशातही इस्लामी संस्कृतीची सक्ती करण्यात आली होती. शेरवानी व पायजमा असा गणवेश होता.[५] हैद्राबाद संस्थानात जबाबदार शासनपध्दती अस्तित्वात नव्हती. संस्थानात संघटना स्वातंत्र्य नव्हते. वृत्तपत्रांवर अनेक बंधने होती. लोकांच्या स्वातंत्र्याची गळचेपी होत होती. रझाकारी संघटनेचे अत्याचार वाढतच चालले होते.

हैद्राबाद मुक्तीसंग्राम आणि दलित

निजामाच्या या अन्यायी राजवटीला प्रतिकार करण्याचा, विरोधात आवाज उठवण्याचा अनेकांनी प्रयत्न केला, संघटित झाल्याशिवाय निजाम राजवटीला विरोध करणे अशक्य आहे हे लक्षात आल्यानंतर अनेक संघटना उदयास आल्या. त्यात धार्मिक व सामाजिक संघटनाही होत्या. राजकीय संघटनांचे योगदान महत्वाचे आहे. महाराष्ट्र परिषद, स्टेट कॉंग्रेस, आर्य समाज, हिंदू महासभा, इत्यादी संघटनांचे योगदान महत्वपूर्ण आहे. हैद्राबाद

Scanned by CamScanner

मुक्तीसंग्रामाच्या या लढयात स्त्रिया होत्या, शेतकरी होता आणि त्याच बरोबर महत्वाचा घटक होता तो दलित समाज हैद्राबाद मुक्तीसंग्रामातील लढयात दलितांचे योगदान महत्वपूर्ण आहे.

हैद्राबाद मुक्तीसंग्रामात दलितांचे योगदानही वाखाणण्यासारखे आहे. त्यांच्या हैद्राबाद मुक्तीसंग्रामातील योगदानाची, सहभागाची नोंद केल्याशिवाय मुक्तीसंग्रामाचा इतिहास पूर्ण होणार नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर निजाम राजवटीमधील हरिजनांना (दलितांना) कळकळीचा सल्ला देत होते की, ''काय वाटेल ते झाले तरी अस्पृश्यांनी निजाम व इत्तेहादुल मुसलमीनची बाजु घेऊ नये. स्पृश्यांच्या जुलमाने आपण आंधळे होता उपयोगी नाही. अस्पृश्यांची चळवळ स्वातंत्र्याची व विमुक्तीची आहे व निजाम त्याविरुद्ध आहे. अस्पृश्य हे या भुमितले असुन इतराप्रमाणेच हिंदुस्थान त्यांचाही मायदेश आहे. त्यांनी मातृभुमीच्या स्वातंत्र्यासाठी व अखंडत्वाकरिता इतरांप्रमाणेच झुंजले पाहिजे. त्यासाठी हैद्राबादने हिंदी संघराज्यात सामील झाले पाहिजे असा आग्रह आपण धरला पाहिजे. निजाम हिंदी संघराज्याच्या विरोधी असल्यामुळे त्याला सहानुभूती दाखवण्याचे काहीच कारण नाही. निझामाचे हित तो जाणतो. पण त्याने काही केले तरी माझ्या जमातीचे लोक मातृभूमीच्या शत्रुला सामील होत नाहीत याची खबरदारी घेणे हे माझे कर्तव्य आहे व म्हणूनच मी निजामीतील अस्पृश्यांना वरील आदेश देत आहे.[६] डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वरील विवेचनावरून त्यांची हैद्राबाद मुक्तीसंग्रामाबद्दलची भूमिका स्पष्ट होते.

हैद्राबाद संस्थानामध्ये तीस लाखाच्या आसपास दलितांची संख्या होती. संस्थानात दलितांच्याही काही संघटना होत्या. त्यापैकी केवळ अंजमन-ई-पस्तकर्दा-अख्वामचा इत्तेहादुल मुसललीम था संघटनेशी राजकीय समझोता होता. तिचे नेते रावसाहेब, बी.एस.व्यंकटराव यांनी विशिष्ट परिस्थितीत आजाद हैद्राबादचा पुरस्कार केला होता. परंतु शेडयुल्ड कास्ट फेडरेशन व इतर दलित संघटनांनी मात्र निजामाच्या विरोधी भूमिका घेतली. निजामविरोधी लढयात सामान्य दलित जनता सहभागी होती. त्यांचा हा लढा गुणात्मक दृष्टया महत्वाचा होता. कोणत्याही समुहापेक्षा तो दूर्लक्षीण्यासारखा तर मुळीच नव्हता.[७] स्टेट काँग्रेसने सत्याग्रह सुरू केला होता, हा सत्याग्रह मोडीत काढण्याचे काम सरकार करत होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्टेट काँग्रेसच्या सत्याग्रहाविषयी म्हणाले की, स्टेट काँग्रेसने चालविलेला सत्याग्रह हा योग्य आहे, त्यांनी सत्याग्रहाचे समर्थनच केले. निजाम सरकारने स्टेट काँग्रेसवर बंदी घातल्यावर डॉ.आंबेडकर कडाडले, मसंस्थानात निघणाऱ्या संस्थांना जन्मापूर्वीच कसे नख लावण्यात येते ते पाहावयाचे असल्यास तिथे स्टेट काँग्रेसला कसे बेकायदेशीर ठरविण्यात आले हया वर्नि दिसून येईल.[८] खेडयापाडयातील दलित युवकही निजामाच्या विरोधात उभा राहीला होता. दलितांनी वंदे मातरम, सत्याग्रह, जंगलतोड इत्यादी कृतीत सहभाग नोंदवला.

लोहा येथील विश्वनाथ माधव महाबळे, हरी रामा महाबळे, नामदेव संताजी महाबळे, संभा नामदेव कापूरे इ. दलित मंडळी पोलिसांना हुलकावण्या देत पैठणला गेली व सत्याग्रह केला. निजाम कोर्टाने ३ वर्षे ४ महिन्यांची शिक्षा ठोठावली त्यांना औरंगाबादच्या मध्यवर्ती कारागृहात डांबण्यात आले. नंतर त्यांना हैद्राबादच्या तुरूंगात पाठविण्यात आले.[९] पाथरीचे डॉ. देवराव कांबळे, त्यांचे सहकारी शंभू बापूराव काळभोर महार, ज्योती नाईक महार, सोपान महाबळ महार, इंगळे मांग, शंकर संभाजी चांभार यांनी १९३८ वंदे मातरम् चळवळीत सहभाग घेतला होता.[१०] दलितांचा जंगल सत्याग्रहातील सहभागही महत्वाचा आहे.

१५ सप्टेंबर १९४७ पासुन जंगल सत्याग्रहाला सुरूवात झाली. शिंदीच्या झाडाच्या लिलावापोटी निजाम सरकारला मिळणारा महसूल बंद व्हावा हा जंगल सत्याग्रहाचा प्रमुख हेतू होता. निजामाच्या राज्यात शिंदीची झाडे तोडणे हा कायद्याने गुन्हा होता. शिंदीच्या झाडाला मडके अडकविणे, शिंदी काढणे हे काम अस्पृश्यांना करावे लागे. असे मडके अडकवलेले झाड भल्या पहाटे मडके काढून घेतल्यानंतर तोडीत, पण तो अस्पृश्य कधीच कुणाचे नाव निजाम पोलीसांना सांगत नसे. जेंव्हा स्टेट काँग्रेसने जंगल सत्याग्रहाचा आदेश दिला तेंव्हा दलितांनीही यामध्ये सहभाग नोंदविला. दलित स्त्रियाही या सत्याग्रहात सहभागी झाल्या. परभणी जिल्हयात शंभर टक्के जंगल सत्याग्रह यशस्वी झाला, तो दलित व शेतकरी वर्ग त्यात सामील झाल्यामुळेच जंगल सत्याग्रहात स्वातंत्र्य प्राप्तीच्या निर्धाराने स्वत:च्या रक्ताने सह्या केलेली शेकडो प्रतिज्ञापत्रे स्वामी रामानंद तिर्थांना

Scanned by CamScanner

सादर करण्यात आली. त्यात दलितांच्याही स्वाक्षऱ्या होत्या.[११] रेल्वेच्या घातपाताच्या कार्यक्रमामध्ये वाहतूक बंद पाडणे, रेल्वे रूळ उखडणे, रेल्वे स्टेशनला आगी लावणे इ. कार्यक्रम आखण्यात आले. यात दलितांनी भाग घेतला. नांदेड व लिंबगाव या रेल्वेस्टेशनच्या दरम्यान रेल्वे रूळ उखडण्याचे काम ८ ते १० अस्पृश्य रेल्वे गँगमननी केले. या प्रकरणात मुकादम मोरेसह सर्वांवर खटले भरण्यात आले. त्याचप्रमाणे मुकादम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली १० ते १५ अस्पृश्य गँगमननी बोल्डा-नांदापूर दरम्यान रेल्वे रूळ उखडण्याचे काम केले. पोलीस ॲक्शनपर्यन्त हा मार्ग वाहतुकीसाठी पुन्हा मोकळा होऊ शकला नाही. रेल्वे स्टेशन जाळण्यातही दलित आघाडीवर होते.[१२] दलित गँगमनच्या घरी स्वातंत्र्य सैनिकांची हत्यारे ठेवली जात. ज्यांच्याकडे हत्यारे ठेवली जात आणि ज्यांनी रेल्वे घातपात घडवून आणले ते दलित गँगमन खरोखरच परागंदा झाले. त्यांचा शोध घेण्याच्या प्रयत्नांना अपयश आले.

समारोप

दलित समाज हा हैद्राबाद मुक्तीसंग्रामाचा केवळ तटस्थ निरिक्षक नव्हता. त्यानेही या मुक्ती संग्रामात स्वत:ला वाहून घेतले. निजामाची अन्यायी सत्ता उलथून टाकण्यासाठी तोही मनापासून लढला. कम्यूनिस्ट पक्ष, हैद्राबाद स्टेट शेडयूल्ड कास्ट फेडरेशन, आर्यसमाज, स्टेट काँग्रेस इत्यादी संघटनेच्या माध्यमातून दलित समाजाने निजाम आणि रझाकाराविरूद्धच्या लढयात भाग घेतला. हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामाच्या लढयात सर्वच स्तरातून सहभाग नोंदवला गेला. गरीब होते, दलित, श्रीमंत, शेतकरी आणि कामगारही होते. समाजात विविधता असली तरी त्यांच्यात एकजुट ही होतीच. संकट समयी एकमेकांसाठी जीव देण्याचीही तयारी होती. त्यांच्या परिश्रमाला तोड नव्हती. त्यांची मालमत्ता लुटली, तुर्गींत डांबले, प्रसंगी ठार मारले तरी ही समाजातील सर्व स्तरातून हा मुक्तीसंग्रामाचा लढा तिव्र केला गेला.

सारांशरूपात येवढेच म्हणावे लागेल की, हैद्राबाद मुक्तीसंग्रामाच्या (स्वातंत्र्य संग्रामाच्या) इतिहासाला दलितांच्या सहभागाची त्यांच्या शोर्यशाली, धैर्यशाली आणि कृतीशील लढयाची सोनेरी पाने जोडली नाहीत तर तो अपूर्णच राहील.

संदर्भ

१. खोत श्रीनिवास/ विर्धे दिंगंबर, हैद्राबादच्या मुक्तीसंग्राम आणि आम्ही, विर्धे दिगंबर, साकेत प्रकाशन प्रा.लि.११५, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती १९९३, पृ.क्र.५४
२. कित्ता, पृ.क्र.९३
३. कित्ता, पृ.क्र.१७७
४. भालेराव अनंत, हैद्राबादचा स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा, मौज प्रकाशन, मुंबई सप्टेंबर १९८७ पृ.क्र.४७
५. चपळगावकर नरेंद्र, कहाणी हैद्राबाद लढयाची, देशमुख आणि कंपनी, पब्लिशर्स प्रा.लि.पुणे १९९९, पृ.क्र.११
६. खोत श्रीनिवास, विर्धे दिगंबर उपरोक्त, पृ.क्र.१७२
७. गायकवाड नरेंद्र, मराठवाड्यातील दलित चळवळ आणि हैद्राबादचा स्वातंत्र्य संग्राम, सुगावा प्रकाशन पुणे, १९९० पृ.क्र.१०१-१०३
८. कित्ता, पृ.क्र.१०८
९. कित्ता, पृ.क्र.११०
१०. देव प्रभाकर (संपादक), हैद्राबाद मुक्तीसंग्राम, स्वातंत्र्य सैनिकांच्या मौखिक नोंदी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, १९९९, पृ.क्र.१०३.
११. गायकवाड नरेंद्र, उपरोक्त, पृ.क्र.११६
१२. कित्ता, पृ.क्र.१२९.

Scanned by CamScanner

Globalization & Public Administration: Pros and Cons

Editors

Dr. M.C. Pawar

Dr. Pratibha Patil

EDUCATIONAL PUBLISHERS

Globalization –Economic Development In India

*Dr. Raut Radheshyam Kisanrao

Introdution:-

Globalization essentially is a micro economic process. It is driven by the growing significance of transnational corporation (TNC's) in global economy. A TNC refers to an enterprise having a significant degree of control over value adding activities in to or ore nations. (See During 1989).Globalization has become one of the "buzzwords" in the discussion on International Business these days.

Globalization leads to an expanding global economy. It is a process, which trends to increase the interdependence, integration and links between the economics various nations. FDI flows over the years have contributed to the increased economic integration, globalization process on a worldwide level. During 1983-1990 FDI outflows have grown at the rate of 29% per annum on average s against the rate of world output (4%) and exports (6%). In the Asia Pacific Region, South East Asian nations have been major beneficiaries of the globalization process .For instance, Malaysia trade/ GDP ratio was estimated to be 152% in 1991, which is among the highest in the world .World economic integration can be attributed to trade, investment to flows and increasing globalization process of the MNCs. Globalization implies a process of internalization in which companies gradually and incrementally expand their international involvement. Globalization is an evolutionary process of increasing involvement in international business operations. Under globalization the business firms undertake coordinated activities as single entities operating in a single, global market economy, rather than a host country basis. For example, subsidiaries of Sony operating in Malaysia and Thailand imply globalization business of Sony, Ohmae entions about "global signposts" of globalization as follows.

Innovation and extensions of information and Communication Technology (ICT), ICT has made business communication across world quick and instantaneous.

Concept of Globalization:-

a) Globalization is a new evolving paradigm of international business and marketing. It is a process of integration of the world into a single huge market, in the sense .It implies unification of national markets in evolving global economy.

b) Globalization is a broader tear than internationalization.

* Dr. Raut Radheshyam Kisanrao, Associate Professor in Economics, Sant Ramdas Arts, Commerce & Science College, Ghansawangi, Ta.Ghansawangi, Dist.Jalna. Email ID.-rkraut88@gmail.com

ISBN- 978-93-81921-46-3

Terrorism :
A Challenge before Human Rights

HUMAN RIGHTS EDUCATION
SANGAMNER COLLEGE

दहशतवाद : मानवी हक्कांसमोरील आव्हान

Editor
Prin. Dr. K. K. Deshmukh
Dr. Pratap Phalphale

ISBN- 978-93-81921-46-3

IMPACT OF TERRORISM

Dr. Radheshyam Kisanrao Raut
Associate Professor in Economics
Sant Ramdas Art's,Com. & Sci.College,
Ghansawangi,Ta. Ghansawangi, Dt. Jalna 431209
Email ID -rkraut88@gmail.com
Mob. No - 9423274488

TRODUCTION

e human cost of terrorism has been felt in virtually every corner of the globe. The ited Nations family has itself suffered tragic human loss as a result of violent rorist acts. The attack on its offices in Baghdad on19 August 2003 claimed the es of the Special Representative of theSecretary-General, Sergio Vieira de Mello, d 21 other men and women,and injured over 150 others, some very seriously.

rorism clearly has a very real and direct impact on human rights, with devastating nsequences for the enjoyment of the right to life, liberty and physical integrity of tims. In addition to these individual costs, terrorism can destabilize vernments, undermine civil society, jeopardize peace and security, and threaten cial and economic development. All of these also have a real impact on the joyment of human rights.

curity of the individual is a basic human right and the protection ofindividuals is, cordingly, a fundamental obligation of Government. Statestherefore have an ligation to ensure the human rights of their nationalsand others by taking positive asures to protect them against the threatof terrorist acts and bringing the petrators of such acts to justice.

recent years, however, the measures adopted by States to counterterrorism have emselves often posed serious challenges to humanrights and the rule of law. Some tes have engaged in torture and otherill-treatment to counter terrorism, while the gal and practical safeguardsavailable to prevent torture, such as regular and dependent monitoringof detention centres, have often been disregarded. Other tes havereturned persons suspected of engaging in terrorist activities to untrieswhere they face a real risk of torture or other serious human rights use,violating the international legal obligation of non-refoulement.The dependence of the judiciary has been undermined, in some places,while the use of -optional courts to try civilians has had an impact onthe effectiveness of regular rt systems. Repressive measures have been used to stifle the voices of human hts defenders, journalists, minorities,indigenous groups and civil society. sources normally allocated to socialprogrammes and development assistance e been diverted to the security sector, affecting the economic, social and cultural hts of many.

ISBN:978-93-80039-09-1

3rd INTERNATIONAL CONFERENCE

on Current Issues in Education & Social Sciences

09th & 10th May 2015

Organized by

Faculty of Education

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University Aurangabad. (M.S.), India.

In collaboration with

Depatrment of Education, Dr. B. A. M. U., Aurangabad.

and

Jay Prakash Narayan College of Education, Aurangabad.

Editors

Dr. Shobhana Joshi
Dr. Ganesh Shetkar
Dr. Balaji Lahorkar
Dr. Satish Satav

The Role of Higher Education In Economic Development

Dr. Raut Radheshyam Kisanrao, Associate Professor in Economics, Sant Ramdas College, Ghansawangi, Dist Jalna Pin code-431209
rkraut88@gmail.com ,Mo. 09423274488

Abstract:

The role of higher education as a major driver of economic development is well-established, and this role will increase as further changes in technology, globalization, and demographics impact the United States. To remain competitive in light of these changes, regions will need to improve productivity and adopt an innovative spirit. Higher education has the capacity, knowledge, and research necessary to help achieve these goals (Sampson, 2003; 2004).

The focus of this report is the role of higher education in the economic development of Illinois' Rock River Region. A brief summary of economic development issues in this region is given, followed by a general discussion of the role of higher education in economic development and specific actions taken by the institutions of the Higher Education Alliance for the Rock River Region (HEARRR) Northern Illinois University, Rockford College, Rock Valley College, and University of Illinois College of Medicine.

The Role of Tertiary Education In The Knowledge Economy

In the knowledge economy tertiary education has become far more widespread than in earlier generations. The development of a class of knowledge workers is transforming labor forces and economies. As electronic devices and robots increasingly accomplish human tasks, the need for routine skills – both manual and cognitive – are decreasing, while the demand for expertise and communication skills of all kinds is rapidly rising. The need to understand and interact with images and data is increasing the demand for analytical and integrative skills in even basic functions. This phenomenon stretches educational and organizational systems, as they straddle specialized and generalized skills. Also, although research on the impact of the knowledge economy on employment creation and growth is still at a preliminary stage, efforts have begun, particularly in advanced economies, to quantify its effects. Brinkley and Lee (2006) studied rates of job creation in knowledge-based sectors and low-knowledge sectors in the European Union and USA over a ten-year period. They found that knowledge-based industries created twice as many new jobs in the USA and four times as many in Europe.

The World Bank (2007) also reported that industrialized countries, for which the term 'knowledge economy' was initially derived, are coping unevenly with the new realities. The nations of North America seem to have benefited quickly from the new opportunities offered, with a higher growth rate and higher productivity performances over the last 15 years or so. Gaps in income per inhabitant between North America and Europe have increased. In Europe, small, dynamic economies such as Finland have become models of knowledge-based growth and competitiveness; while larger continental economies such as France and Germany – which led the technological and industrial race in past decades– have had difficulty adjusting. Meanwhile, Japan has experienced a difficult decade, with slow growth caused by a variety of factors, but has continued to build knowledge economy assets (by increasing spending on basic research, for example) and to maintain the competitive edge of its global manufacturing companies. The Republic of Korea, meanwhile, has actively embarked on a knowledge economy track to recover from the financial crisis of 1997/1998.

On the whole however, there is a strong correlation between innovation performances, total factor productivity, and economic growth in OECD countries. Nordic and English-speaking countries have, as a whole, performed better than others.

The transition economies of Eastern Europe have had difficulty coping with the new knowledge-based competition, although they benefited from considerable past investments in education and science. Smaller economies such as Hungary, Slovenia and Estonia have coped well and taken advantage of European enlargement. Estonia, in particular, has adopted an aggressive knowledge economy approach. However, a number of other new EU members and candidates are undergoing a more painful adjustment process. The Russian Federation and other countries of the former Soviet Union have yet to demonstrate their capacity to make use of a knowledge potential that was considerable at the time when the Berlin Wall fell but eroded rapidly owing to the migration of highly educated people.

ISBN NO-978-93-80986-74-6

UGC SPONSORED

ONE DAY NATIONAL SEMINAR

"IMPORTANCE OF HUMAN RIGHTS"

31st January, 2015

HUMAN RIGHTS

Organized by

Department of Political Science
New Art's Commerce & Science College,
Nalwadi, Wardha (M.S.)

The Human Rights

ISBN NO.: 978-93-80986-74-6

मानवाधिकार एवं महिला

डा. जीआर. अवचार
राजनीतिशास्त्र विभागाध्यक्ष एवं सहा.प्रोफेसर
शा.रामदास महाविद्यालय, घनसावंगी, जि. जालना
ई-मेल : awchargr@gmail.com
Mob. 8793550635 / 9404426348.

३९.	संस्कृत नाटक - नांदी परंपरा	कु. प्रणिता उद्धवराव पाटील (पवार)	१४०
४०.	व्यंग्यार्थातील सूचकता	डॉ. आशा मुंडे	१४५
४१.	काव्यशास्त्रातील औचित्य विचार	प्रा. ओमप्रकाश मदनसुरे	१४
४२.	अभिनव गुप्ताच्या सिध्दांताचा प्रभाव	प्रा. शंकर धारबा घाडगे	१५
४३.	काव्यालंकार चर्चा	प्रा. किरण आर. नागपूरकर	१५
४४.	प्राचीन साहित्यमीमांसकानी प्रतिपादिलेली साहित्य लक्षणे : एक अभ्यास.	प्रा.अशोक भानुदासराव केंद्रे	१
४५.	काव्य प्रयोजन चर्चा	प्रा. राजेंद्र प्रसाद किशनराव आर्य	१
४६.	संस्कृत काव्यशास्त्राचा मराठी साहित्यावरील परिणाम	प्रा.डॉ. नरसिंग कदम	१
४७.	संस्कृत काव्यशास्त्र आणि तुकोबांचा अभंग	प्रा. सुधीर गरड	
४८.	प्रियदर्शिका नाटिकेतील विविध अलंकारांची उदाहरणे	संतोष महादेव कदम	
४९.	काव्यशास्त्रातील उपमा अलंकाराचा भवभूतीच्या उत्तररामचरित नाटकावर झालेला प्रभाव.	प्रा. जाधव एम.एस.	

CONTENTS

18. **DISCOURSE IN THE NOVEL – AN ESSAY BY M.M. BAKHTIN** 341
Shweta Sharma

19. **WOMEN EXPLOITATION RELATED ISSUES COVERAGE** 345
Kapil Dev, Anjum Shaheen

20. **PACKAGE DESIGN PERCEPTION: A MANAGEMENT MODEL** 349
Subramanian, S.R.

21. **EMPOWERING WOMEN THROUGH EDUCATION** 352
Dr.Kesang Degi

22. **HINDU-CHRISTIAN COMMUNALISM, INTERACTIVE TRADITIONS** 355
Immanuel Ebenezar E.D.

23. **FALLING IN LINE: A CASE STUDY ON SITUATING STUDENTS** 364
Shiny Bhardwaj, Jamia Millia Islamia

24. **THE NEED FOR REMEDIAL TEACHING IN LANGUAGE LEARNING** 368
Dhaygude kakasaheb dhondiba

25. **INTERACTIVE ART AND ARCHITECTURE AS RESOURCES** 371
Immanuel Ebenezar E.D.

26. **RETIRED PEOPLE: ECOMOMIC MULTIPLIERS** 377
Arun Raste

27. **A STUDY ON THE EFFECT OF MODULAR APPROACH** 381
Dr. B. Reena Tok, Subhangini Boruwa

28. **ICONIC DESIGNS OF AGRA'S MUGHAL MONUMENTS** 385
Meenakshi Kumar Seth, Dr. Parul Bhatnagar

29. **VOCATIONAL EDUCATION WITH SKILL DEVELOPMENT** 389
Dr. Parul Bhatnagar, Radhika Seth, Meenakshi Kumar Seth

30. **THE ROLE OF ICT TO PRODUCE ENHANCED EDUCATIONAL** 392
L.Mathu Krithigha

31. **SOCIAL WORK INTERVENTION FOR WOMEN TO COPE HIV** 396
Mary Princess Lavanya

32. **HUMAN ECOLOGICAL STUDIES IN A SEMI-ARID VILLAGE** 399
C.Jeyalakshmi

33. **THE GENDERED BODY: GENDER POLITICS AROUND** 403
Manjima Biswas

34. **A STUDY ON RELATION BETWEEN PROFILE** 407
Dr. K. Anitha Kumari, Dr. Ch. Venugopal Reddy, K.N.Raja Kumar

ISBN 978-93-84124-21-2

CONTENTS

18. LANGUAGE PROJECTS: AN INNOVATIVE PRACTICE IN ELT
Vakulabharanam Anantalakshmi

19. USING SHORT STORIES AND INTERESTING LITERARY TEXTS
Gurmeet Sodhi

20. ENGLISH LANGUAGE NEEDS OF UG AGRICULTURE STUDENTS
Sarap N.S.

21. TWO CITIES, TWO CULTURES, ONE WORLD
Binu George

22. THE PARALLELISM OF CASTE CONSCIOUSNESS
Samjy Mathew

23. EVOLUTION OF WEST AFRICAN WRITINGS IN ENGLISH
M.Priya

24. SOCIALITE EVENINGS: A QUEST FOR IDENTITY
Joan Leela Madtha

25. TEACHING MEDIA LANGUAGE IN THE RECENT SOCIO-CULTURAL
Kakasaheb D Dhaygude

26. TREATMENT OF NATIONALITY, INTERNATIONALITY
Abdul Nasir Vellarampara

27. 'LIMINALITY: A PROBLEM OR A STATE?' CRITICAL ANALYSES
Sruthy B

28. ECOCRITICISM: A MIND EXPANDING STUDY
Dr. Suresh Frederick

29. REPRESENTATION OF CASTE, CLASS AND GENDER
Mahesh Naik S, Dr. Nagya Naik B.H

30. ENHANCING THE SOFT SKILLS OF ENGINEERING STUDENTS
Radhika Shanmugam

31. THE SHATTERED DREAMS OF REPATRIATION
Dr. A. Sheeba Princess

32. THE JOURNEY OF THE NIGERIAN WOMEN EN ROUTE
Velma Mohan

33. LANGUAGE ON THE THRESHOLD OF THE GLOBALIZATION
Dr. Preeti Oza

34. YOUTH REQUIRE SOFT SKILLS TODAY
B. Shoba.Rao

ISBN 978-93-84124-19-9

CONTENTS

18. LANGUAGE PROJECTS: AN INNOVATIVE PRACTICE IN ELT
Vakulabharanam Anantalakshmi

19. USING SHORT STORIES AND INTERESTING LITERARY TEXTS
Gurmeet Sodhi

20. ENGLISH LANGUAGE NEEDS OF UG AGRICULTURE STUDENTS
Sarap N.S.

21. TWO CITIES, TWO CULTURES, ONE WORLD
Binu George

22. THE PARALLELISM OF CASTE CONSCIOUSNESS
Samjy Mathew

23. EVOLUTION OF WEST AFRICAN WRITINGS IN ENGLISH
M.Priya

24. SOCIALITE EVENINGS: A QUEST FOR IDENTITY
Joan Leela Madtha

25. TEACHING MEDIA LANGUAGE IN THE RECENT SOCIO-CULTURAL
Kakasaheb D Dhaygude

26. TREATMENT OF NATIONALITY, INTERNATIONALITY
Abdul Nasir Vellarampara

27. 'LIMINALITY: A PROBLEM OR A STATE?' CRITICAL ANALYSES
Sruthy B

28. ECOCRITICISM: A MIND EXPANDING STUDY
Dr. Suresh Frederick

29. REPRESENTATION OF CASTE, CLASS AND GENDER
Mahesh Naik S, Dr. Nagya Naik B.H

30. ENHANCING THE SOFT SKILLS OF ENGINEERING STUDENTS
Radhika Shanmugam

31. THE SHATTERED DREAMS OF REPATRIATION
Dr. A. Sheeba Princess

32. THE JOURNEY OF THE NIGERIAN WOMEN EN ROUTE
Velma Mohan

33. LANGUAGE ON THE THRESHOLD OF THE GLOBALIZATION
Dr. Preeti Oza

34. YOUTH REQUIRE SOFT SKILLS TODAY
B. Shoba.Rao

ISBN 978-93-84124-19-9

A CRITICAL STUDY OF MAHESH DATTANI'S PLAY *DANCE LIKE A MAN*
Bharat Arvind Tupere & V.M. Rasure
188 - 193

MYTH IN CONTEMPORARY INDIAN ENGLISH NOVEL
Manoj C. Zade
194 - 199

DISLOCATION & IDENTITY IN TONI MORRISON'S NOVEL *JAZZ*
Prashant U. Gambhire
200 - 204

RECENT TRENDS IN ENGLISH LANGUAGE TEACHING
Sangeeta Subhash Hingmire
205 - 213

HUMANITY AT RECEIVING END IN DAVID MITCHELL'S *CLOUD ATLAS*
Kakasaheb D. Dhaygude
214 - 218

LITERATURE AND ENVIRONMENT: A ECOCRITICAL NOTE
Parmeshwar V. Zakade
219 - 227

FEMINIST ISSUES IN THE POEMS OF KAMALA DAS: A STUDY
B.N. Waghmare
228 - 236

IDENTITY CRISIS: A STUDY OF BHARATI MUKHERJEE'S *JASMINE*
Madhav D. Shrimangale
237 - 242

VISHWABHARATI

RECENT TRENDS IN ENGLISH LANGUAGE & LITERATURE

Volume 1



Dr. D.P. Garud
Chief Editor

Dr. T.M. Pawar
Editor

ISBN :978-81-930150-8-7

International Conference

on

||Sant Mahatmyanchi Bhumi||

Histories of Interactions, Connections & Subjectivities in Aurangabad Region

19-20-21, June, 2015.

Conference Souvenir

Organized by

Urdu Education Society, Aurangabad

Chishtiya College, Khuldabad & Aurangabad History Society, Aurangabad

Sponsered by

UGC & ICSSR New Delhi &

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University Aurangabad (M.S.) INDIA

मध्ययुगीन कालखंडातील संत तुकाराम महाराजांचे सामाजिक योगदान

प्रा. डॉ. राजेंद्र थाये,
'सहयोगी प्राध्यापक', इतिहास विभागप्रमुख
संत रामदास महाविद्यालय, घनसावंगी, जि. जालना.

मध्ययुगात मानवी जीवनाच्या शिक्षण, साहित्य, कायदा, नीती, इत्यादी सर्व क्षेत्रात धर्माचे अधिराज्य चाले. समाजाची उंचनीच पातळी धर्मकल्पनांच्या शुद्धाशुद्धतेवर अवलंबून असे. म्हणून धर्मजीवन निकोप राखण्याची जबाबदारी तत्वज्ञ, आचार्य, शास्त्रज्ञ पंडीत व भक्तीमार्गी संत ह्या समाजधुरिणांवर पडे. रुढ तत्वचर्चा आणि शास्त्रनिर्णय यांचा प्रवाही लोकजीवनाशी मेळ बसणे ज्या-ज्या परिस्थितीत अशक्य होई, त्या त्या वेळी मानवतेला आवाहन करुन सदाचाराचा नवा आदर्श घालून देणारे संतच त्या त्या काळच्या परिस्थितिप्राप्त लोकजीवनाला योग्य वळण लावण्यास समर्थ ठरल्याचे दिसून येते.[1] लोकजीवनात संतांचे कार्य महत्त्वपूर्ण राहीलेले आहे.

महाराष्ट्रात संत परंपरेचा उदय तेराव्या शतकाच्या उत्तरार्धात यादवांच्या राजवटीत झाला. यादव राजे वैदिक धर्माचे पुरस्कर्ते होते. सर्व लोकांचे आचरण बहूशः श्रुतिस्मृतिपुराणोक्त विचारांना अनुसरुन चालले होते. शंकराचार्यांच्या मायावादी अद्वैतवादाची छाप महाराष्ट्रातील बुद्धिवंतांवर पडली होती. वैदिक परंपरेचे पुनरुज्जीवन करणारे टिकाग्रंथ विज्ञानेश्वर, हेमाद्री, श्रीधर बोपदेव इत्यादी पंडीत लिहित होते. ज्योतिष, गणित, वैद्यक, संगीत इत्यादी लौकीक विद्या-कला यांवरही ग्रंथ-निर्मिती होत होती. पण हे सारे ज्ञानभांडार संस्कृतमध्ये असल्याने उच्चवर्णीयांपुरतेच मर्यादीत राहात होते. शिवाय त्यांच्या जीवन व्यवहारात शब्द प्रामाण्य नि तंत्रनिष्ठा यांवरच भर असे, त्यामुळे उच्चवर्णीय शास्त्री-पंडीत प्रेरणाशून्य व प्रवाहपतित बनले होते. त्यांच्यांत द्वैती-अद्वैती, कर्ममार्गी-ज्ञानमार्गी, स्मार्तभागवत इत्यादी पंथोपपंथ निघून वैचारीक दृष्ट्या सर्वत्र अराजक माजले होते, एकंदरीत तेराव्या शतकाचा उत्तरार्ध हा वैदीक संस्कृतीच्या दृष्टीने धर्मग्लानीचा व सामाजिक अवनतीचा काळ होता. या सांस्कृतिक अधःपाताला तोंड देण्यासाठी भारताच्या निरनिराळ्या प्रदेशात लोकभाषांतून भक्तीमार्गाचा प्रचार करणारे भागवतधर्मी संत पूढे आले.[2]

भक्तीपंथापूर्वीच्या काळात महाराष्ट्रात अनेक समूह नांदत होते; पण समाज नव्हता. येथे वेगवेगळी दैवते, वेगवेगळ्या उपासनापद्धती, वेगवेगळे खेळ व वेळ घालविण्याची साधने होती. या भूभागावर राहाणाऱ्या सर्वांना एकत्र आणील असे काही नव्हते. भक्तीसंप्रदायांनी या वेगवेगळ्या समुहांना एकत्र आणून एक समाज निर्माण करण्याचे कार्य केले. भक्तीपंथाच्या संतांचे साहित्य हे आध्यात्मिक लोकशाहीचे साहित्य आहे. हे साहित्य म्हणजे समता, बंधुता व आध्यात्मिक स्वातंत्र्य यांची निःश्वासितेच आहेत. या साहित्याने समाजाला मातृभाषेविषयी, मराठी भाषेविषयी आस्मिता दिली. संतांच्या या साहित्यामूळे साहित्य हे ब्राह्मण, शूद्र अशा कोणत्याही एका समूहाचे न राहाता ते मराठी साहित्य झाले. संत साहित्याने निर्माण केलेले आध्यात्मिक आदर्श व ध्येय यांच्या एकात्मतेचा परिणाम म्हणून समाजाचे भौतिक आदर्श, ध्येय व भाषा यांचीही एकात्मता झाली. म्हणून भक्तीपंथाच्या संतांनी केवळ साहित्य निर्माण केले असे नाही तर महाराष्ट्रातील लोकांना त्यांनी राष्ट्र बनविले.[3] असे वा.ब. पटवर्धन स्पष्टपणे नोंदवतात. न्यायमूर्ती रानडे यांनी महाराष्ट्रातील संतांची चळवळ व पश्चिम युरोपातील धर्मसुधारणेची चळवळ यामध्ये कसे साम्य आहे.[4] हे दाखवून दिले. त्याचबरोबर संतांची धर्मसुधारणेची चळवळ ही त्या काळातील राजकीय चळवळीला पुरक होती अशी न्यायमुर्ती रानडे यांची भूमिका होती.

संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, एकनाथ याच संत मालिकेतील संत तुकाराम महाराज पण एक संत. तुकारामांनी भक्तीपंथाचा प्रसार करताना समाजातील नीतिमूल्यांची जोपासना केली असे म्हटले तरी एवढ्याने त्यांच्या कामगिरीचा पुरा उलगडा होत नाही. तुकाराम जातीने शुद्र व व्यवसायाने वैश्य होते. त्यांनी आपल्या अभंगात या गोष्टीचा अनेकदा उल्लेख केला आहे. महाराष्ट्रात शहरे अगोदर थोडी आणि त्यामानाने व्यापारही बेताचाच. यामूळे येथील सर्वसाधारण वैश्यांची स्थिती शूद्रांहून फार भिन्न नव्हती. तेंव्हा महाराष्ट्रातील बहूजन समाजाची संस्कृती ही मुख्यतः शेतकऱ्यांची व कारु-नारुंचीच होती असे म्हणावयास हरकत नाही. या वर्गाच्या भावना आणि आकांक्षा तुकारामांच्या वाङ्मयात आत्मीयतेने प्रकट झाल्या आहेत. हेच त्यांच्या व्यक्तीभावाचे वैशिष्ट्ये आहे. "संत तुकाराम महाराजांबद्दल महाराष्ट्रातील ख्यातनाम विचारवंत व इतिहासाचे गाढे अभ्यासक डॉ.आ.ह. साळुंखे म्हणतात की, 'तुकाराम! मानवी जीवनातील नाना प्रकारच्या उत्कट अनुभवांना अत्यंत आशयघन शब्दांत साकार करणारा एक शब्दार्थप्रभू प्रतिभावंत. धर्माला नीतीचे आणि निष्कपट भावनेचे अधिष्ठान देणारा एक आचारशील भक्त. अक्षरशः सर्वस्व पणाला लावून सांस्कृतिक व सामाजिक अन्यायाच्या विरोधात दंड थोपाटणारा एक आव्हानवीर योद्धा, प्रतिभावंत, भक्त आणि योद्धा या तिन्ही भूमिकांचा एकत्र मिलाफ झालेला महापुरुष-कवी तुकाराम, संत तुकाराम, विद्रोही तुकाराम."[5] तुकाराम महाराज हे डोळस आणि संवदेनशील गृहस्थ होते. ते डोळस असल्यामुळे आपल्या अवती-भोवतीच्या सामाजिक परिस्थितीचे बारकाईने निरिक्षण करीत होते. त्यामुळे आपल्या समाज-व्यवस्थेतील त्रुटी आणि उणिवा त्यांना जानवू लागल्या होत्या. धर्माच्या नावाखाली होणारा अन्याय,

मराठ्यांच्या इतिहासाचे पुनर्लेखन

REWRITING OF THE MARATHA HISTORY

संपादक

डॉ. जगदीश भेलोंडे डॉ. कारभारी भानुसे

डॉ. प्रकाश महाजन



10 छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेत संत तुकाराम महाराजांचे योगदान

डॉ. राजेंद्र धाये

सहयोगी प्राध्यापक व इतिहास विभागप्रमुख,

संत रामदास महाविद्यालय, घनसावंगी जि. जालना.

---

१७ व्या शतकामध्ये शहाजी राजांचा पुत्र शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली. रयतेचे लोककल्याणकारी राज्य स्थापन करुन त्यांनी एक क्रान्ती घडवली. ग्रँट डफ या इंग्रज अधिकाऱ्याने मराठा सत्ता अस्तास गेल्यानंतर मराठ्यांचा समग्र इतिहास इ.स. १८२६ मध्ये तीन खंडात प्रसिद्ध केला. ग्रँट डफ आपल्या ग्रंथाच्या सुरुवातीसच लिहितो की, सह्याद्रीच्या रानात वाळलेले गवत पेटून जसा वणवा पेटतो, त्याप्रमाणे महाराष्ट्रातील ह्या मूळच्याच उच्छृंखल व लुटारु वृत्तीच्या हिंदूंनी (मराठ्यांनी) मुसलमान राज्यकर्त्यांच्या विरुद्ध उठाव केला, आणि मग या उठावाच्या वणव्याचे दूरदुरचे लोकही आश्चर्य करु लागले.[1] म्हणजेच, तो मराठी सत्तेच्या स्थापनेला (स्वराज्य) अचानक पेटलेला वणवा संबोधतो. या स्वराज्य स्थापनेचे श्रेय तो शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाला, पराक्रमाला देत नाही. विनायक दामोदर सावरकर शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेबद्दल म्हणतात की, दैवाने म्हणा, देवाची इच्छा म्हणून म्हणा, काकतालीय न्यायाने म्हणा, किंवा पेरलेल्या प्रयत्नांचे अेकसमयावच्छेदेकरुन बहरुन आलले पीक म्हणून म्हणा, पण, जिजामातेच्या गृहांगणातील शिवाजीच्या ह्या जन्मापासून अेक आश्यर्यकारक परिवर्तन हिंदू - मुसलमान युद्धसंघर्षातील राष्ट्रीय रणांगणातही घडून आले.[2] म्हणजेच सावरकरही शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेच्या कार्याला योगायोगच समजतात. काही इतिहासकार तर शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेचे श्रेय त्यांच्याशी काहीही संबंध नसणाऱ्या व्यक्तींना देवून टाकतात, तेही त्यांचे मार्गदर्शक, गुरु ठरवून.

इतिहास हा व्यक्तींविषयी, व्यक्तींच्या उपक्रमाविषयी, चळवळींविषयी काही उच्चारण करीत असतो. म्हणजे माहिती देत असतो. ही माहिती कथाकादंबऱ्याप्रमाणे काल्पनिक नसते. कागदपत्रे, पत्रव्यवहार, बखरी रोजनिशा, नाणी, ताम्रपट, कोरीव लेणी इत्यादी

20

" बाबासाहेब आंबेडकरोत्तर परिवर्तनवादी दलित चळवळ"

कौतिक दांडगे
संशोधक विद्यार्थी
इतिहास विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

डॉ. राजेंद्र घाये
मार्गदर्शक
सहयोगी प्राध्यापक व इतिहास विभागप्रमुख,
संत रामदास महाविद्यालय, घनसावंगी,
जि.जालना.

प्रस्तावना :

नामांतर आंदोलनाने दलितांमध्ये सांस्कृतिक क्रांतीचा प्रारंभ केला. जातीव्यवस्थेने नाकारलेल्या शूद्रातिशूद्रांच्या प्रतिकाना मानचिन्हांना सन्मान मिळवून देणारा हा लढा होता. तो एक व्यवस्था परिवर्तनाच्या लढ्याचा एक महत्त्वपूर्ण भाग असून क्रांतीकारी असे जनआंदोलन होते की, ज्यामध्ये लाखो वेगवेगळ्या जातीधर्मातील स्त्री-पुरुषांनी प्रत्यक्षा सहभाग घेतला आणि स्त्री-पुरुषांतील कृत्रिम भेदाभेद नष्ट करणारा ठरला. समाजात अस्तित्वात असलेली हजारो वर्षांपासून चातुर्वण्य जातीव्यवस्था व त्यामुळे पदोपदी दिसणारी व अस्पृश्यशंना लाभगत असलेली उच्च-निचता, भेदाभेद, शोषण, अमानुषता इत्यादी विरूद्धचा हा संघर्ष होता. नामांतर चळवळीत खरे तर सर्वसामान्य माणसाने खूप मोठा त्याग केला. नामांतर चळवळीत बाबासाहेबांवरील निष्ठेपायी तो या लढत्या स्वयंस्फूर्तीने सामील झाला होता.

मराठवाडा विद्यापीठाची स्थापना :

मराठवाड्यासाठी स्वतंत्र विद्यापीठ निर्मीतीचा ठराव झाला आणि मग या ठरावाच्या अंमलबजावणीसाठी मराठवाड्यातील शिक्षण तज्ञ विधी मंडळाचे सदस्य, संसद सदस्य यांनी पाठपुरावा सुरू केले. दि. ९ जानेवारी १९५७ रोजी या मंडळींचा सहभाग असलेले एक शिष्ट मंडळ मुंबई राज्याचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांना भेटले. चव्हाण हे शिक्षण प्रेमी असल्यामुळे त्यांनी या विषयाला प्राधान्य दिले कारण १९५० साली जेथे एकाच खाजगी महाविद्यालय होते ते त्या मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यामध्ये महाविद्यालये सुरू झाली होती. त्यांचे सुसुत्रीकरण महत्त्वाचे होते आणि म्हणूनच ना. यशवंतराव चव्हाण यांनी दि. २७ एप्रिल १९५७ रोजी न्या. पळणीटकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली या समितीकडे अनेक कामे सोपविण्यात आली होती या समितीवर प्रा.म.भि. घिटणीस, डॉ. डी.डी. शेंदारकर, सेतु माधवराव पगडी यांची नियुक्ती झाली होती.[१]

भूमीहिनांचा लढा :

आपण नादुरूस्त की दुरूस्त यापेक्षा जनतेचे प्रश्न घेऊन लढा उभारतो की नाही हे महत्त्वाचे. हा धागा घेऊन नारुरूस्तवाल्यांनी भूमीहिनांच्या प्रश्नावर लक्ष केंद्रित केले. दि.१४ व १५ मे,५९ रोजी पार पडलेल्या अधिवेशनात एक महत्त्वाचा ठराव पास करण्यात आला होता, तो असा - "सर्व जमिनीची मालकी सरकारने घ्यावी व त्या जमिनीवर काम करू इच्छिनाऱ्यांना काम करू द्यावे. खर्च वजा जाता उत्पादनाची वाटणी समप्रमाणात करावी."[२]

बौद्धांना सवलती :

१९५६ पासूनचा एक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे बौद्धांना सवलती देण्याचा. बाबासाहेबांनी धम्मदिक्षा १४ ऑक्टोबर,५६ ला घेतल्यानंतर महाराष्ट्र (मुंबई) सरकारने विपरीत अहवाल पाठविला असणार, कारण 'सर्व भारत बौद्धमय करेन' ही बाबासाहेबांची घोषणा पंचशीलाचा आग्रह धरणाऱ्या पं. नेहरू यांना सुद्धा पेलवता येण्यासारखी नव्हती आणि म्हणून सरकारने तातडीने दि.०२.१०.५६ रोजी ६३ वी घटना दुरूस्ती

ISBN NO. 978-93-83401-27-7

INTERNATIONAL JOURNAL OF MULTI DISCIPLINARY RESEARCH (IJMR)

ISSN 2277-9302
Vol. VI, Issue 5 (II), September 2016

Refereed Journal

ISSN: 2277-9302

श्री क्षेत्र विज्ञानेश्वर, आपेगाव : एक दृष्टीक्षेप

डॉ. राजेंद्र साहेबराव घावटे
सहयोगी प्राध्यापक व
इतिहास विभागप्रमुख,
संत रामदास महाविद्यालय,
घनसावंगी जि. जालना.

सामाजिक शास्त्रे, विज्ञान, तंत्रज्ञान अशा सर्व क्षेत्रामध्ये संशोधनाच्या माध्यमातून माहितीचा प्रवाह वाढत आहे. बौद्धिक आणि व्यावहारिक समस्यांची उत्तरे शोधून काढणे हा संशोधनाचा प्रयत्न असतो. आरंभीपासूनच मानवाला आपल्या सभोवतालच्या घटकाबद्दल कमालीची उत्सुकता वाटत आली आहे. यामुळे मानवाने भोवतालच्या परिसराविषयी सतत चिंतन केलेले दिसते. म्हणूनच एखाद्या ऐतिहासिक समृद्ध परंपरा लाभलेल्या मंदीराविषयी संशोधन होऊन त्यावर प्रकाश पडणे गरजेचे ठरते. मानवाची सामाजिक प्रतिबद्धता, अध्यात्मिक अनुभूतीची क्रियात्मक अभिव्यक्तीशी संबंधित परंपरा, विश्वासाला व श्रद्धेच्या समष्टीला मंदीर संस्कृती म्हणतात. कोणत्याही देवस्थानाला जो दर्जा मिळतो तो श्रद्धेवर अवलंबून असतो. म्हणूनच एखादी इमारत, स्थान, ओटा, दगड वा आसन यांनाही हा दर्जा मिळू शकतो. यासाठी देवस्थान मोठे वा प्रसिद्धच असावे असे काही आवश्यक नसते. भारतात धार्मिक भावना प्राचीन कालखंड ते आजतागायत प्रबळ राहिलेली आहे. म्हणून विविध मंदीर भारतीयांनी निर्माण केली. ती जोपासली व वाढवली आहेत. काळाच्या ओघात या मंदीरांच्या विविध स्थापत्य शैली उदयास आल्या. या शैली मंदीराच्या रचनेवरून पडल्या आहेत. एकाच देवाची मंदीरही भारतात सारखी नाहीत. त्याचे एकमेव हेच कारण आहे. मंदीर स्थापत्याच्या बाबतीत विविधता असली तरी भारतीयांची श्रद्धा व भावना नेहमीच धर्मनिरपेक्ष राहिलेली आहे. देवांच्या मूर्तीची घडणही वेगवेगळी आहे. काष्ठकला, शिल्पकला, चित्रकला व कोरीव काम ही मंदीराची अविभाज्य अंग राहिलेली आहेत. प्राचीन काळापासून मंदीरांना सजावट करणे हे नित्याचेच होते. मंदीराच्या काही नव्या भागांचा विकासही नवीन दृष्टीने झालेला दिसतो. काही मंदीरात मूर्ती प्राचीन पण मंदीर आधुनिक काळाचे प्रतिक अशीही रचना आपणास पाहावयास मिळते.[1] सर्व प्रकारच्या धार्मिक वास्तूंच्या निर्मितीमागे एक तत्वज्ञानात्मक विचारधारा होती. त्यानुसार इमारतीचा विकास केला जाई. मंदीराची इमारत ही केवळ त्या देवतेचे निवासस्थान नव्हे तर त्या देवाचे ते शारीरिक स्वरूप होय, अशी दृढ भावना होती. म्हणून आजही अनेक भाविक देवालयात प्रवेश करताना प्रवेशद्वाराच्या पायरीला हात लावून वंदन करतात. देवालय व त्याचे शिखर उंच-उंच बांधण्यामागे वास्तुशास्त्रविषयक गरजेचा किंवा सौंदर्याचा विशेष भाग नाही. तर स्वर्ग व पृथ्वी यांना विभागणाऱ्या मेरू पर्वताची ती प्रतिकृती आहे, अशी श्रद्धा आहे. या शास्त्र ग्रंथात मंदीराच्या विविध भागांच्या प्रमाणांचे निश्चित नियम सांगीतलेले आहेत. गर्भगृहाच्या भिंतीची रुंदी ही मूलभूत प्रमाण घटक मानली जाते. गर्भगृह हे नेहमी घनाकारच असले पाहिले असा नियम घालून दिलेला आहे. त्याची उंची भिंतीच्या रुंदी इतकीच असली पाहिजे. त्यावरील शिखराची उंची भिंतीच्या उंचीच्या दुप्पट असावी. त्याप्रमाणेच मंदीराच्या विविध भागांची मोजमाप तपशिलवार दण्यात आली आहेत.[2] ..... मूळ भारतीय धर्मात, म्हणजेच वैदिक संस्कृतीत देवांना अग्निमध्ये आहुती दिल्या जात आणि आहुती अग्नी देवांना पोचवतो अशी धारणा होती. त्यामुळे यज्ञाविधी हाच पूजेचा एकमेव प्रकार प्रचलित होता. मूर्तिपूजेचे उल्लेख वेदांमध्ये आढळत नाहीत. त्यामुळे देवांच्या मूर्ती बनवणे आणि या मूर्तीकरीता वास्तू किंवा मंदीर बांधणे ही संकल्पनाच वेदविधींना अज्ञात किंवा परकी होती. त्यामुळे आपल्या आचार्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या प्रतिकांची किंवा त्यांच अवशेषांनी युक्त असलेल्या स्तूपासारख्या वास्तूची पूजा करणाऱ्या बौद्धांना आणि जैनांनाही ती नवीन होती असे युरोपीय विद्वानांच्या एका गटाचे ठाम मत होते.....[3]

भारतीय जीवनप्रणालीचा व विशेषत: महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचा विचार करता शिवाला समर्पित असलेली मोठी परंपरा रूढ आहे. बारा ज्योतिर्लिंग किंवा चारधाम यांविषयीचे आकर्षण भारतीय मनाला कायम राहत आले आहे. या पार्श्वभूमीवर विज्ञानेश्वराचे आपेगाव या शिवस्थानाला विविध पैलू असून अनेक अंगांनी त्याचा विचार करावा लागतो. आज रुढ असलेल्या गोदावरीच्या प्रवाहापासून या स्थानाची उंची साधारणत: २४ ते २५ मीटर आहे. पात्रात दत्तात्रेयांचे एक स्थान दाखवले जाते. समोरच दक्षिण तटावर पांचाळेश्वर हे महानुभावांचे स्थान आहे.[4] अंबड तालुक्यातील गोदावरीच्या उत्तर काठावर वसलेले हे गाव विज्ञानेश्वराचे आपेगाव म्हणून ओळखले जाते. शहागड, पैठण या उपमार्गावर हे स्थान आहे. मराठवाड्याने महाराष्ट्राला दोन ज्ञानेश्वर दिले. एक आपेगावचे संत ज्ञानेश्वर तर दुसरे आपेगावचे विज्ञानेश्वर. या दोन पैकी एक आपेगाव औरंगाबाद तर दुसरे जालना जिल्ह्यात आहे. या विज्ञानेश्वराच्या आपेगावची माहिती महानुभावांच्या स्थान पोथीत आहे. याच आपेगावी श्री क्षेत्र विज्ञानेश्वर यांचे एक भव्य मंदीर आहे. मंदीराच्या चारही बाजूला भव्य अशी तटबंदी आहे. गर्भगृहाच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या आतील बाजूस एक शिलालेख असून तो प्रकाशित आहे.

श्री वंकनाथ देवाचे चरण ओल-गाओ। सें
नन्मज ..... त्प का.....
यस्ख धारुपंडीत अन्वय पदमण पंडीतु सुतु
पेईदेओ पंडितु जी।

असा शिलालेख असून या लेखाचे वाचन डॉ. शं.गो. तुळपुळे यांनी केले आहे. लेखास दोन बाजू असून मध्ये एक मुर्ती आहे. त्यात चार ओळी असून वंकनाथ म्हणजे शिव, त्यालाच विज्ञानेश्वर असे अक्षरशत्रीका यादवकालीन आहे. तो १२ व्या शतकापूर्वीचा असावा, असे डॉ. तुळपुळे म्हणतात. वंकनाथ म्हणजे शिव, त्यालाच विज्ञानेश्वर असे म्हणतात. तसेच विज्ञानेश्वराचे मूळ नाव वंकनाथ आहे, हेही यावरून कळते. कोणीतरी विज्ञानेश्वर उपासकाने हा शिलालेख कोरून ठेवला आहे. हा उपासक पेईदेव पंडीत या पदमन पंडीत नामक कायस्थाचा पुत्र होता. त्याने या विज्ञानेश्वराची मनोभावे सेवा केली असा उल्लेख लेखात मिळतो. शक्यता आहे की, यानेच या शिवमंदीराची उभारणी केली असावी. या मंदीराची उपासना पुढे चालू राहावी ही अपेक्षा तो व्यक्त करतो. मात्र त्याने मंदीराला काय दिले हे कळत नाही. शिलालेखाच्या शेवटी शापवचन व आशीर्वचन आहे.[5] या स्थानाच्या संदर्भात लिला चरित्र व गोदावरी महात्म्यात अनेक संदर्भ आलेले आहेत. स्वत: चक्रधर स्वामींनी पूजा करून या लिंगास विडा वाहिला, असे उल्लेख मिळतात. गोविंद प्रभु यांनीही या स्थानास भेटी दिल्याचे उल्लेख मिळतात.

श्री प्रभु गोसावी। आत्मतीर्थपासी ।।२४।।
विज्ञानेश्वरासी। विजे केले।

Administration Of Shivaji Present Perspectives

NATIONAL CONFERENCE

Feb. 12 & 13-2016



Associate Editor
Dr. Darade S.S.
Assit. Professor Dept. of History

Guest Publisher
Dr. Kalhapure G.B.
Principal

Chief Editor
Dr. Sonawane D.J.
Head & Assit. Professor Dept. of History

छत्रपती शिवाजी महाराजांची चलन व्यवस्था

- डॉ. राजेंद्र धाये
'सहयोगी प्राध्यापक' व इतिहास विभागप्रमुख संत रामदास महाविद्यालय, घनसावंगी, जि. जालना.

छत्रपती शिवाजी महाराजांचे आयुष्य हे स्वातंत्र्यरक्षणाच्या ध्येयाने प्रेरित होऊन अविश्रांत झगडणाऱ्या, पण तरीही विचार आणि विवेकाची कास न सोडणाऱ्या मानवश्रेष्ठाचे चरित्र आहे. महाराजांची ध्येये, त्यांचे रणांगणातील कौशल्य, लष्करी डावपेच, वेळप्रसंगी माघार तर संधी पाहून आक्रमण, आपण स्थापित असलेले राज्य हे खऱ्या अर्थाने कल्याणकारी ठरावे, आपल्या जनतेचा सर्वांगीण विकास व्हावा, आपले सांस्कृतिक जीवन समृद्ध व्हावे आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे राष्ट्राची अस्मिता जागृत व्हावी यासाठी महाराजांनी केलेली प्रयत्नांची पराकाष्ठा हे सर्व पाहता त्यांचे आयुष्य म्हणजे समकालीनांना एक चमत्कार तर वाटलाच, पण आजतागायत भारतातील पिढ्या त्यांच्या चरित्राने भारावून गेल्या आहेत.[१] प्रत्येक स्वतंत्र राज्याची कायम अशी काही धोरणे असतात. ती सोडून त्यास आपले स्वतंत्र अस्तित्वच टिकवता येणार नाही. तसेच प्रत्येक चिरकाल टिकणाऱ्या राज्यास काहीतरी नैतिक पाया की, जो राज्याच्या अस्तित्वाचेच नैतिक आदिकारण जे प्रजारंजन त्याला कायम पोषक होईल असा असावा लागतो. मोगल बादशाही एका दृष्टीने परकी ना, पण तिचेही एक नैतिक कारण व तेच तिचे धोरण होते. आखिल भारत वर्षात सतराशे छपन्न लहानमोठे संस्थानिक जिवंत राहून त्यांनी सतत आपसांत झगडत राहावे, प्रजेची सारखी पायमल्ली करावी, अनेक करांनी प्रजेस नाडावे, सर्वच व्यवहार अडचणीचा करावा, सार्वत्रिक हिताची कामे हातात घेण्यास दौर्बल्यामूळे नेहमीच असमर्थ राहावे, सांस्कृतिक वाढीस अवसरच न ठेवावा, अशा स्थितीपेक्षा एकच राज्य-आसेतु-हिमाचल असावे; त्यातील राज्यपद्धती एकसारखी असावी; राज्याची भाषा, कालमापन, नाणी, वजने, एक असावीत; बऱ्याच प्रजाविभागाने सतत परचक्राच्या भयात रहाण्यापेक्षा कायम शांतता अंतस्ततः तरी नांदावी हे इष्ट नव्हते काय?[२] छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापण केलेले राज्य आसेतू हिमाचल नसले तरी स्वराज्यातील प्रत्येक व्यक्तीला ते आपले वाटत होते. राज्यात सुव्यवस्था होती, रयतेच्या भाजीच्या देठालाही हात लावण्याची कोणाची हिम्मत नव्हती. प्रशासकीय कारभार नियंत्रित व चोख होता. चलन व्यवस्थेविषयी सुद्धा शिवाजी महाराज अत्यंत जागरुक होते. त्यांचीही एक स्वतःची चलन व्यवस्था होती. त्यांनी चलनाचे महत्व ओळखले होते. म्हणूनच त्यांनी इंग्रजांना आपल्या राज्यात त्यांच्या नाण्याला सतत विरोधच दाखवला. इंग्रजांना त्यांनी आपल्या राज्यात नाणे (इंग्रजांचे) चलनात आणण्यास सतत विरोधच केला. ही त्यांच्या चलन व्यवस्थेची दूरदृष्टीता होती.

सतराव्या शतकात दख्खन देशात-ज्यात महाराष्ट्र, आंध्र, कर्नाटक प्रांत मोडतात- विविध प्रकारची नाणी प्रचलित होती असे उपलब्ध ऐतिहासीक साहित्यावरुन दिसून येते. महाराष्ट्रापुरते बोलायचे झाले तर ऐतिहासीक दस्तऐवज आणि बखरीतून शिवराई, होन, फनम, चक्रम, पादशाही होन, निशाणी होन आणि होनांचे इतर प्रकार यांचा उल्लेख आढळतो. होन हा कानडी शब्द असून त्याचा अर्थ सुवर्ण असा आहे. याखेरीज लारी, रुपये, अश्रफी, टका ही चांदीची आणि छत्रपती अथवा शिवराई, सजगणी, तिरुका, रुका, पैसा, दाम, अडका, चवल, जित्तल, दुवल, पाल, ब्याल अशी तांब्याची नाणी आर्थिक व्यवहारासाठी वापरली जात होती. अगदी छोट्या देव-घेवीसाठी कवड्यांचा देखील वापर केला जाई.[३] शिवकालीन महाराष्ट्रात सोन्याची, चांदीची आणि तांब्याची नाणी प्रचलित होती, ही सर्वच नाणी महाराष्ट्रात पाडलेली नव्हती. मुघल, मुसलमान

Kamaladevi Educational Trust's

NATIONAL SEMINAR ON

"DR. BABASAHEB AMBEDKAR : A TRUE BUILDER OF NATION AND GLOBAL LEADER"

Organized by
Department of Social Science

Kamaladevi College of Arts and Commerce

(Affiliated to University of Mumbai)
Established in 2009-2010

Opposite Vitthalwadi Railway Station,
Behind S T Bus Depot,
Vitthalwadi (East), Kalyan -421305
Phone No. 0251-2360084/ 2360023

Email: ketkdcollege555@rediffmail.com
Website: kamaladevicollege.org

27th February, 2016

BA -61

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार

डॉ. राजेंद्र धाये,
'सहयोगी प्राध्यापक' इतिहास विभागप्रमुख
संत रामदास महाविद्यालय,
घनसावंगी, जि. जालना.

==========

गोषवारा :

शिक्षण ही व्यक्ती व राष्ट्राच्या जीवनातील एक मौलीक व मूलभूत प्रक्रिया आहे. जीवन व्यवस्थीत जगण्यासाठी, ते सुखी व यशस्वी करण्यासाठी शिक्षण आवश्यक आहे. शिक्षण मानवी जीवनाचा अविभाज्य भाग आहे. शिक्षणामुळे व्यक्ती व समाज बाह्य आणि आंतरिक अंगाने बदलतात. शिक्षण व्यक्तीच्या भावना आणि सहजप्रवृत्ती संस्कारीत करते, व्यक्तींना सुसंस्कृत, संवेदनशील आणि विवेकशील बनविते. तिच्यामध्ये स्वतंत्र, चिकित्सक व सर्जनशील विचार करण्याची कुवत निर्माण करते. शिक्षणामुळे व्यक्तीला तिच्या अवती–भोवती कोणत्या घटना घडत आहेत, त्यामागची कारणे कोणती असावीत आणि त्यासंदर्भात स्वतःला काय करणे शक्य आहे? याचे भान येते. शिक्षण व्यक्तीमध्ये अन्याय, शोषण, गुलामगिरी याविरुद्ध संघर्ष करण्याची चेतना निर्माण करते. शिक्षण व्यक्तीमध्ये नवीन विचार आणि मूल्यांचे स्फुलिंग टाकते. व्यक्तींना भोळ्या समजूती आणि अंधश्रद्धांतून मुक्त करते. व्यक्तीला शिक्षणातून विधायक दृष्टी प्राप्त होते. [1] जागतिक मानवी समूह हे ढोबळ मानाने प्राचीन दासप्रथा, मध्ययुगीन सरंजामशाही व आधुनिक भांडवली व्यवस्था अशा टप्प्यांमधून विकसित झाले. दुसऱ्या शब्दांत हे मानवी समुद दासप्रथेवर आधारलेली गुलामगिरी, त्यानंतर भूदासांच्या शोषणावर आधारलेली सरंजामशाही व नंतरच्या काळात कामगारांच्या शोषणावर अधिष्ठीत असलेली औद्योगिक भांडवलशाही अशा अवस्थांमधून सातत्याने सापेक्षतः अधिक प्रगत समाजव्यवस्थेच्या दिशेने संक्रमित झाले. या समाजव्यवस्थांमध्ये शिक्षण व्यवस्थेचे स्वरुप वैशिष्ट्येपूर्ण राहिले आहे. या प्रत्येक कालखंडातील शिक्षणव्यवस्था ही त्या काळातील सत्ताधारी वर्गाने स्वतःच्या नियंत्रणात ठेवली व तिचे स्वरुपदेखील स्ववर्ग हितास पोषक राहील असेच ठेवले.[2] अशी मांडणी कार्ल मार्क्स या तत्वज्ञाने केलेली आहे. ब्रिटीशांनी भारतात सुरु केलेली शिक्षणपद्धती ही भारतातील ब्रिटीशपूर्व शिक्षणपद्धतीपेक्षा आमुलाग्रपणे भिन्न होती. ही शिक्षणपद्धती भारतात जरी ब्रिटीशांच्या वासाहतिक गरजेतून विकास पावली असली व तिचे स्वरुप हे वसाहतवादाला पोषक असे जरी राहीलेले असले तरी ती भारतीय जातपिडीत शिक्षणपद्धतीपेक्षा गुणात्मकदृष्ट्या भिन्न होती, अधिक प्रागतिक होती.[3] ब्रिटीशांच्या शिक्षणपद्धतीने भारतीयांना नव्या वैश्विक व वैज्ञानिक दृष्टीकोनाची ओळख करुन दिली. आणि हीच घटना भारतीयांच्या दृष्टीने महत्त्वाची ठरली.

ISBN No. 978-93-83342-25-9

46.

महात्मा गांधी आणि लोकशाही राज्य

डॉ. राजेंद्र साहेबराव धाये
'सहयोगी प्राध्यापक' व इतिहास विभागप्रमुख,
संत रामदास महाविद्यालय, घनसावंगी, जि. जालना.

जगात आज तंत्रज्ञानाचा स्फोट झालेला आहे. मानवाने विज्ञानात अत्युच्च शोध लावले आणि जगाला जवळ आणण्याचे महान कार्य साधले. आज जगाने विज्ञानात प्रगती साधली असली तरी त्याच प्रमाणात मोठ्या समस्याही आज जगासमोर येऊन ठेपल्या आहेत. या सर्व समस्यांचा शोध आम्हाला, विचारवंतांना आणि वैज्ञानिकांना गांधी विचारातच आहे हे स्पष्ट होते.

लोकशाहीत लोकमताची सत्ता चालली पाहिजे. जर सरकारच प्रत्येक गोष्ट करु लागले आणि लोक काहीच करीनासे झाले किंवा सरकारला मोडता घालू लागले तर तो लोकशाहीचा अभाव होईल.[५] लोकांचे सरकार हे कधीही लोकमताच्या पुढे जाऊन काम करणार नाही. ते जर लोकमताच्या विरुद्ध गेले तर त्याचा नाश होईल. लोकशाही शिस्तबद्ध व सुबुद्ध असणे ही जगात पहिली महत्त्वाची गोष्ट आहे. जी लोकशाही पूर्वग्रहांनी दूषित, अज्ञानी, खोट्या समजूती बाळगणारी असेल ती अंधाधुंदीत सापडेल आणि आपोआपच नष्ट होऊन जाईल.[६] जेंव्हा लोक एखादी विशिष्ट गोष्ट मानतात आणि मागतात अशा वेळी लोकशाहीत घाबरटपणा मुळीच चालणार नाही. लोकांच्या प्रतिनिधींनी या मागणीला फक्त आकार देणे आणि ती सुलभ करणे एवढेच त्यांचे काम आहे.[७] लोकांच्या हाती सत्ता केंद्रित झाली म्हणजे त्याच्या स्वातंत्र्यात होणाऱ्या हस्तक्षेपाचे प्रमाण कमी-कमी होत जाते. जे राष्ट्र सरकारच्या हस्तक्षेपाशिवाय आपले कार्य शांततापूर्वक व परिणामकारकरित्या करुन दाखविते त्यालाच खऱ्या अर्थाने 'लोकशाहीप्रधान राज्य म्हणता येईल. जेथे अशी परिस्थिती नसेल तेथे सरकारचे बाह्य स्वरुप कितीही लोकशाहीचे असले तरी ती केवळ नाममात्र लोकशाही ठरेल. दहा-वीस व्यक्ती एखाद्या केंद्रस्थानी बसून खरी लोकशाही चालवू शकत नाहीत. तिला खालपासून गावोगावीच्या लोकांमार्फत चालविता येईल.'[८] गांधीजी असेही म्हणतात की, खरीखुरी लोकशाही प्रस्थापित होऊन लोकांच्या हाती सत्ता आल्यास प्रजेच्या स्वातंत्र्यात होणाऱ्या हस्तक्षेपाचे प्रमाण कमी होत जाईल. निराळ्या रितीने असे म्हणात येईल की, राजसत्तेच्या हस्तक्षेपाची गरज न पडता जे राष्ट्र आपले व्यवहार शांततामय आणि प्रभावी रीतीने करु शकेल, तेच खऱ्या अर्थाने लोकतंत्रात्मक ठरेल. जेथे अशी परिस्थिती नसेल तेथील राज्य बाह्यतः लोकशाही दिसले तरी खऱ्या अर्थाने ते लोकशाही असणार नाही.[९] गांधीजी लोकशाहीच्या संदर्भात आपली मते मांडतात ती स्पष्टपणे. ते स्पष्ट म्हणतात की,

Shahu Shikshan Sanstha Pandharpur, Sanchalit

VASUNDHARA KALA MAHAVIDYALAYA, JULE SOLAPUR

NAAC Accredited 'B' Grade

ON THE OCCASION OF 125TH BIRTH ANNIVERSARY OF
BHARAT RATNA DR. BABASAHEB AMBEDKAR

INTERDISCIPLINARY INTERNATIONAL

Conference on

DR. BABASAHEB AMBEDKAR'S CONTRIBUTION IN NATION BUILDING

10th April 2016

Universal Aurora



डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धार्मिक विचार

डॉ. राजेंद्र साहेबराव धाये
सहयोगी प्राध्यापक,इतिहास विभागप्रमुख,संत रामदास महाविद्यालय,घनसावंगी जि. जालना.

प्रस्तावना : -

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विसाव्या शतकातील भारतामधील सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीचे एक प्रमुख प्रणेते होत. शेकडो वर्षे धर्माच्या नावाने दडपल्या गेलेल्या तळागाळातील लोकांमध्ये स्वत:च्या हक्कांची जाणीव निर्माण करुन, ते मिळविण्यासाठी संघर्ष करण्यास त्यांनी त्यांना प्रवृत्त केले. इंग्रजी राजवटीत आपल्या सामाजिक जीवनात सुधारणा घडवून आणण्यासाठी ज्यांनी तळमळीने प्रयत्न केले ते न्या. रानडे, महात्मा जोतीराव फुले, शाहू छत्रपती, महात्मा गांधी इत्यादी सुधारकाग्रणी, वृत्तीने धार्मिक होते. सुधारणेच्या कार्यक्रमाला नैतिक अधिष्ठान मिळवून देण्यासाठी त्यांनी धर्माचा आधार घेतला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे त्याच वातावरणात वाढले. त्यांचे वडील कबीरपंथी असून ते आपल्या मुलांना दररोज कबीराचे दोहे व संतांचे अभंग म्हणण्यास लावीत. डॉ. आंबेडकरांनी मराठी संत कवींच्या साहित्याचा सखोल अभ्यास केला होता. पुढे उच्च शिक्षणासाठी परदेशात गेल्यावर अर्थशास्त्र, समाजशास्त्र, मानववंशशास्त्र इत्यादी आधुनिक शास्त्रांचा त्यांनी पद्धतशीरपणे व्यासंग केला. साहजीकच आधुनिक शास्त्रीय दृष्टीकोनातून त्यांनी धर्माची चिकित्सा केली आहे.1 डॉ. आंबेडकरांच्या मते धर्म हा शब्द निश्चित अर्थ-दुर्लभ, व्याख्याविहीन शब्द आहे. कारण 'धर्म' या संकल्पनेची वेगवेगळी अवस्थांतरे झालेली आहेत. या प्रत्येक अवस्थेतील संकल्पनेला धार्मिक विचार असे संबोधण्यात आले होते. वस्तुत: एका अवस्थेतील संकल्पना ही पूर्वीच्या किंवा नंतर येणाज्या अवस्थेतील संकल्पनेशी सुसंगत कधीच नव्हती. तर कालमानानूसार तिच्यात बदल होत होता. निसर्गदत्त आपत्ती, उदा- विद्युत्पात, पर्जन्य महापूर घडण्यामागची कारण मिमांसा आद्य मानवास ज्ञात नव्हती. अशा घटनांचे शमन व दमन करण्यास्तव केलेल्या दैवी आचरणांना 'जादूटोणा' असे नाव पडले. त्यामूळे धर्म हा 'जादूटोणा' म्हणून ओळखला जाऊ लागला.2 तद्नंतर दुसज्या अवस्थेत धर्म ही संकल्पना उत्क्रांत झाली. या अवस्थेत 'धर्म' म्हणजे श्रद्धाभाव, पूजा-अर्चा, समारंभ, यज्ञविधी वगैरे अशी भावना रुजली गेली. वेद म्हणजे इंद्र, वरुण, अग्नी, सोम वगैरे देवतांना आवाहन करण्यासाठी म्हटलेल्या वेगवेगळ्या ऋचा व सूक्ते यांचा संग्रह होत. त्यांत उपरोक्त देवतांनी अर्ध्यदान स्वीकारावे व इष्टफळप्रदान करावे यास्तव करण्यात येणाज्या प्रार्थनेचा अंतर्भाव आहे.3 याच काळात काही ऋषींनी विश्वनिर्मिती व विश्वनिर्माता या विषयी आपापल्या अंदाजावरुन काही सिद्धांत मांडले असले तरी, त्यांचे अधिष्ठान, अंधश्रद्धा व अंधविश्वास यावरच होते. सर्व विश्व व्यापाराचे नियमन करणारी, तत्कालीन पुरातन मानवास अज्ञात, अशी कोणती तरी एक प्रचंड शक्ती असावी हे गृहीततत्व त्यात प्राणभूत होते. वैचारिक क्षमता वाढल्याने जादूटोण्याचा प्रभाव या अवस्थेत कमी झाला. जी वैश्वीक शक्ती पूर्वी भयप्रद समजली जात होती ती पूढे कल्याणप्रद समजली जाऊ लागली. या शक्तीला प्रसन्न करुन अंकीत करण्यासाठी किंवा तिचा क्रोध शमविण्यासाठी - तिचा अनुग्रह होण्यासाठी, पूजा-अर्चा यज्ञयाग या बाबी अनिवार्य बनल्या, हळूहळू याच वैश्विक शक्तीस परमेश्वर, परब्रम्ह अशी संज्ञा प्राप्त झाली. तिसज्या अवस्थेत या तथाकथित परमेश्वरानेच ब्रम्हांडाची तशीच सर्व प्राणीमात्राची निर्मिती केली, तसेच मानवी देहात आत्मा असतो, देह धारण करुनही तो देहातीत असतो, तो प्राप्त जन्मातील कार्याबद्दल परमेश्वरास (परमात्मा) उत्तरदायी असतो, ही भावना रुढ झाली.4 सारांशरुपाने बौध्दकाळात धर्म संकल्पना अशाप्रकारे उत्क्रांत झालेली होती, ईश्वर, आत्मा याविषयी आस्तिक्य बुद्धी असलेला, पूजा-अर्चा यज्ञविधी यांना प्राधान्य असलेला धर्म प्रचलित होता.

'जो समाजाची धारणा करतो तो धर्म' अशी धर्माची व्याख्या करण्यात आलेली आहे. ती सर्वमान्य होण्यासारखी आहे. परंतु ही व्याख्या कोण्या एका समाज-धर्माला डोळ्यापूढे ठेवून विशिष्ट धार्मिक हेतूने परिबद्ध झाली असेल, तर मात्र शंकेला जागा आहे. तेथे साहजिकच असा प्रश्न निर्माण होतो की, धर्म समाजाची धारणा करतो तो कोणत्या समाजाची? हिंदु-मुस्लिम समाजाची की, शीख, इसाई ख्रिस्ती समाजाची. यातून कोण्या एका विशिष्ट समाजाचीच धारणा धर्म करीत असेल, तर तो धर्म, धर्म नव्हे. तो अधर्म नसेल कदाचित, पण तो सम्यक, सर्व कुशल

|| तमसो मा ज्योतिर्गमय ||

Shahu Shikshan Sanstha Pandharpur, Sanchalit

VASUNDHARA KALA MAHAVIDYALAYA, JULE SOLAPUR

NAAC Accredited 'B' Grade

ON THE OCCASION OF 125TH BIRTH ANNIVERSARY OF
BHARAT RATNA DR. BABASAHEB AMBEDKAR

INTERDISCIPLINARY INTERNATIONAL

Conference on

DR. BABASAHEB AMBEDKAR'S CONTRIBUTION IN NATION BUILDING

10th April 2016

Universal Aurora

MI BOOK PUBLICATIONS • LAXMI BOOK PUBLICATIONS • LAXMI BOOK PUBLICATIONS • LAXMI BOOK PUBLICATIONS • LAXMI BOOK PUBLICATION

"डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची महाराष्ट्रातील कामगार वर्गासंबंधीची भूमिका"

कौतिक नामदेव दांडगे [१], डॉ. राजेंद्र धाये [२]

[१] संशोधक विद्यार्थी डॉ.बा.आ.म.विद्यापीठ औरंगाबाद, जि. औरंगाबाद

[२] मार्गदर्शकसहयोगी प्राध्यापक व इतिहास विभागप्रमुख संत रामदास महाविद्यालय,घनसावंगी जि. जालना

प्रस्तावना : -

एगणीसाव्या शतकात भारतात विविध चळवळींचा उदय झालेला आहे. त्यापैकी एक म्हणजे महाराष्ट्रातील कामगार चळवळ होय. कामगार चळवळ ही कामगारांचे भांडवलशाहीकडून व ब्राह्मणशाहीकडून होत असलेलल्या शोषणाविरुद्ध लढ्यातून उदय व विकास पावलेली आहे. या काळात विविध उद्योग धंद्यांचा उदय झाला व त्यातूनच त्याला लागणाऱ्या कामगार वर्गाची विविध जाती जमातीतून उदय झालेला आपणा दिसुन येतो.

महाराष्ट्रातली बलुतेदारी पद्धती शेतकरी वर्गाला आपले श्रम पुरवीत असे. यामध्ये प्रत्येक जातीचे व्यवसाय ठरलेले असायचे यात कुणालाही सुट नव्हती. साधारणपणे महार, सोनार, कुंभार, परीट, कोळी मल्हार, न्हावी या जाती सेवा देत असत. सुतार, चांभार, लोहार व मांतग या जाती शेतीसाठी लागणारे साधने पुरवीत असत तर ग्रामजोशी व गुरव या जाती धार्मिक विधीसाठी उपयोग पडत असत. हा श्रमीक वर्ग पिढ्यांपिढ्या राबतच राहिला, संघटीत झाला नाही. तरीही हा वर्ग आजच्या आंबेडकरी कामगार चळवळीला नुसता पूर्वज नसून शिल्कारही आहे असे म्हणणे वावगे ठरणार नाही. ब्रिटिश आगमनानंतर महात्मा फुलेंनी ही चौकट मोडण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या प्रभावातूनच कामगार चळवळीचे जनक असलेले नारायण मेघाजी लोखंडे यांनी वृत्तपत्रे व कामगार चळवळ काढून कामगारांचे प्रश्न मांडण्याचा प्रयत्न केला व त्यांच्याच परंपरेतले डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नंतरच्या काळात कामगारांच्या समस्यांना वाचा फोडली. त्यासाठी त्यांनी कामगार चळवळ उभारली.[1]

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे कामगारांच्या प्रश्नाबाबत अत्यंत जागृत होते. कामगारांना अनुकुल स्थितीतच ते कामगारांन संप व हरताळ करण्यास प्रवृत करत असत. अस्पृश्य कामगारांना कापड खात्यात काम मिळावे यासाठी त्यांनी आग्रही भूमिका घेतली होती. 1934 पासून त्यांनी म्यूनिसीपल कामगार संघाचे अध्यक्षपद स्विकारुन खऱ्या अर्थाने कामगार चळवळीला मूर्तस्वरुप बहाल केले. त्या काळात दलित कामगारांच्या प्रश्नांकडे इतर संघटना जातीने लक्ष देत नव्हत्या. त्यांना सर्व कामगारांच्या समस्या ह्या समान वाटत होत्या परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना कामगारांमधील अस्पृश्यता व जातीयता दिसून आली आणि म्हणून त्यांनी सर्व कामगार वर्ग हा तात्विक पातळीवर एक समान असावा या उद्देशातून स्वतंत्र संघटना स्थापन करण्याचा निर्णय घेतला. ह्या पार्श्वभूमीवर त्यांनी स्वतंत्र मजूर पक्ष स्थापन केला व या पक्षामार्फत कामगारांच्या समस्या व प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.[2]

महाराष्ट्रातील कम्युनिष्टांची कामगारविषयक भूमिका व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका यात फरक असल्याचे दिसून येते. कम्युनिष्टांच्या मते समाजात फक्त मालक व कामगार असे दोनच वर्ग असतात, कामगाराला स्वत:चे कौटुंबिक संबंध आणि भांडवलदाराचे कौटूंबिक संबंध यात साम्य नसते. म्हणून कामगार वर्गाला प्रथम राजकीय सत्ता काबीज करणे आवश्यक आहे. कामगार वर्गाच्या क्रांतीचा हेतू हा राजकीय सत्ता हस्तगत करणे असून अधिसत्ता स्थापन करणे हा आहे. म्हणजे कामगार वर्गाची अधिसत्ता (हूकुमशाही) स्थापन करणे हे मार्क्सवादी विचाराचे वैशिष्ट्य आहे. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना हे मान्य नाही. त्यांच्या मते कामगार वर्गाचे सर्वात मोठे दोन शत्रू म्हणजे भांडवलशाही ब्राह्मणशाही आहे.3 ब्राह्मणशाही जाती जातीत कामगारांना फोडते. ब्राह्मणशाही समता, ऐक्य, बंधुत्त्व या तत्वांना काळे फासणारे विचार होय.

भारतीय कामगार जातीजातीत लढतात. त्यांचे ऐक्य होऊ शकत नाही. एवढेच नव्हे तर कनिष्ठ जातीच्या कामगाराला उच्च जातीचा कामगार आपल्या जवळही बसू देत नाही. याचे कारण म्हणजे भारतात उदयाला येणारा भांडवलदार व कामगार वर्ग हा कोणत्या ना कोणत्या

Releavance of Mahatma Gandhi in 21st Century



Mahatma Gandhi Study Centre, Gunjoti

Shri Krishna Mahavidhyalay
Gunjoti, Tq.Omerga,
Dist.Osmanabad

ISBN No.978-81-931569-9-5

महात्मा गांधीजीच्या 'पंचायत राज्य' विचारांची प्रासंगिकता

डॉ. राजेंद्र धाये
सहयोगी प्राध्यापक व इतिहास विभागप्रमुख,
संत रामदास महाविद्यालय,घनसावंगी जि.जालना.

आज जगात अशी एकही व्यक्ती सापडणार नाही की, त्यांना'म.गांधी'हे नाव माहित नाही.जगातील जवळ-जवळ सर्वच प्रमुख शहरात त्यांचा पुतळा एखाद्या तरी चौकात आढळेलच. त्यांच्या सर्वांगीन विचारांनी जगाला भुरळ घातलेली दिसते. इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती होऊन तिने झपाट्याने जगाला कवेत घेतले.आज जगात औद्योगिकीकरणाचे, तंत्रज्ञानाचे वारे जोरात वाहत आहे.सध्याच्या तंत्रयुगाने जग प्रत्येकाच्या मुठीत आले असले तरी गांधी विचारांचा पगडा आजही जगावर कायम आहे.२१ व्या शतकातही गांधी विचारांची प्रासंगिकता जगाला गरजेचीच वाटते.

'महात्मा'मोहनदास करमचंद गांधी या माणसाला पुरतं जाणून घेण्याची जगाची तहान अजून शमलेली नाही. उलट दिवसेंदिवस ती वाढतच चालली आहे. पृथ्वीवरच्या पाचही खंडांमध्ये माणसासमोर उभ्या ठाकणाऱ्या नवनव्या समस्यांचा वेध घेताना, त्यांची उत्तरं शोधताना निरनिराळ्या 'शिस्ती'त वैचारिक वाढ झालेल्या शहाण्या माणसांना वाटेत 'गांधी'भेटतोच आहे.एकीकडं आजही गांधी ताजा, सुसंगत वाटणारी माणसं आहेत; तशी गांधी या'खलनायका'चे नवनवे पैलू समोर आणणारी,गांधींना पुनः पुन्हा आरोपीच्या पिंजऱ्यात उभी करणारी,त्यांचा'महात्मा'पण उसवून त्यांच्या चिंध्या करु पाहणारी माणसंही आहेत,भरपूर आहेत.तिसऱ्याही प्रकारची माणसं आहेत.ती गांधींच्या व्यक्तीमत्वाचा एकेक पैलू तपासतात.हा माणूस बाप म्हणून कसा होता;नवरा म्हणून कसा होता; 'ब्रह्मचारी'म्हणून कसा होता,'पुरोगामी' होता की 'प्रतिगामी' ..... अशा प्रश्नांची उत्तरं या मंडळींना जबर ताकदीचं भिंग लावून तपासायची असतात. हा उद्योगही सध्या तेजीत

मराठवाडा अर्थशास्त्र परिषदेचे ३३ वे अधिवेशन
दिनांक ५ व ६ फेब्रुवारी २०१६

अमोलक अर्थक्रांती

श्रीमती शांताबाई कांतीलाल गांधी कला, अमोलक विज्ञान व
पन्नालाल हिरालाल गांधी वाणिज्य महाविद्यालय
कडा ता.आष्टी जि.बीड

चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद ९८२२८७५२१९

महाराष्ट्रातील जलसिंचनाचा अभ्यास

मार्गदर्शक
डॉ. राधेश्याम किसनराव राऊत
अर्थशास्त्र विभाग प्रमुख संत रामदास कला,
वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,
घनसावंगी, जि. जालना.

संशोधक विद्यार्थी
जीवन भागवत सपकाळ

प्रस्तावना:

महाराष्ट्र हे भारतातील प्रमुख राज्यापैकी एक आग्रगण्य असे राज्य. परंतु अशा या महाराष्ट्र राज्यालाही एक गंभीर प्रश्न काही वर्षापासून भेडसावत आहे. तो म्हणजे दुष्काळ मानवी जीवनामध्ये हवेच्या नंतर पाणी हा महत्वाचा घटक आहे म्हणून पाण्याला आपण जीवन म्हणतो. पाण्याचा उपयोग मानवाला पिण्यासाठी व घरगुती वापरासाठी तर होतोच त्याशिवाय पशुपालन, जलसिंचन, उद्योगधंदे, जलवाहतूक व मासेमारी इ. कार्यासाठी देखील पाण्याचा उपयोग मानवाला होतो. या मुळेच पाण्याला जीवसृष्टीचा आत्मा म्हटले जाते.

पृथ्वीवर पाणी मुबलक प्रमाणात असले तरी त्याची वाटणी मात्र विषम झाली आहे. तसेच पृथ्वीवरील सर्वच पाणी मानवास उपयोगी नाही पृथ्वीवरील एकूण पाण्याच्या साठयापैकी ९७ टक्के पाणी महासागरात खाऱ्या पाण्याच्या स्वरूपात आहे व ०३ टक्के पाणी गोडया पाण्याच्या स्वरूपात आहे. परंतु या ०३ टक्के पाण्यापैकी २.१ टक्के पाणी घनस्वरूपात आहे. त्यामुळे त्याचा मानवास विशेष उपयोग होत नाही, तर फक्त राहिलेल्या ०.०९टक्के पाण्याचाच उपयोग होतो. जे पाणी नद्या, सरोवरे विहीरी तळी, इ. च्या स्वरूपात आहे. म्हणून जसजशी लोकसंख्या वाढली व कारखानदारिचा विकास होत गेला तसतसे गोडे पाणी मिळणे अवघड झाले. ही बाब लक्षात घेऊनच संयुक्त राष्ट्र सघाच्या सियियानी प्रतिनिधने अशी चेतावणी दिली की "तो दिवस दूर नाही की ज्या दिवशी एक थेंब पाणी, एक थेंब खनिज तेलापेक्षा महाग होईल." आणि आज आपण कमी अधिक प्रमाणात हे अनुभवत आहे.

संपूर्ण महाराष्ट्राचा विचार केला असता दुष्काळ परिस्थिती सर्व भागात सारख्या प्रमाणात नाही त्याला पर्जन्यमान हा नैसर्गिक घटक जवाबदार असला तरी काही राजकीय व प्रशासकिय धोरणेही जवाबदार आहे.आज महाराष्ट्रातील सहा प्रशासकीय विभागाचा विचार केला तर औरंगाबाद व अमरावती विभागातील जलसिंचन क्षमता कमी आहे. या विभागातील मोठया धरणांची संख्या व क्षमता कमी आहे. कालव्याचा विकास हवा तितक्या प्रमाणात झालेला नाही.

मराठवाडा
गती-प्रगती

संपादक

डॉ.बी. आर. गायकवाड

मराठवाडा विभागातील पंतप्रधान रोजगार योजना - एक अभ्यास

डॉ. राधेश्याम किसनराव राऊत,
सहयोगी प्राध्यापक तथा अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
संत रामदास महाविद्यालय, घनसांवगी, जि. जालना.

प्रस्तावना (Introduction)

भारताला १९४७ ला स्वांतत्र्य मिळाल्यापासून भारत हा विकसीत होण्याच्या दृष्टिने पाऊले उचलित असून, १९५१ पासून भारताने पंचवार्षिक योजनेच्या माध्यमातून सर्वांगीण विकास करण्यास सुरुवात केली. मात्र बेरोजगारीचे प्रमाण कमी होत नव्हते. यासाठी पंतप्रधान रोजगार योजना सुरु करण्यासाठी १९९० च्या दशकापासून हालचाली सुरु झाल्या १५ ऑगस्ट१९९३ च्या स्वांतत्र्यदिनी मा. पंतप्रधानांनी राष्ट्राला उददेशून केलेल्या अभिभाषणात, सुशिक्षित बेरोजगांराकरिता प्रभावी स्वंयरोजगार योजना लवकरच विहित करण्याचा मानस व्यक्त केला होता, या बाबीस अनूसरुन केद्र शासनाच्या उद्योग मंत्रालयाने "पंतप्रधान रोजगार योजना" विहित केली असून ती ०२ ऑक्टोबर १९९३ म्हणजेच राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंती दिनांकापासून कार्यान्वित झाली आहे. सदर योजना राज्य शासन भारतीय रिझर्व्ह बँक आणि अन्य वित्तीय संस्था यांच्या मदतीने अंमलात आली आहे.

उद्योग संचालनालयाने प्रस्तुतची योजना जिल्हा उद्योग केद्रांमार्फत राबवावी. तसेच मुंबई उपनगर जिल्हा या दोन जिल्ह्यासाठी ही योजना सहसंचालक (उद्योग)यांनी केद्र शासनाने विहित केलेल्या इष्टकांचे विविध जिल्ह्यासाठी

Special Issue 3rd
Feb. 2016

ISSN-2250-0383
IMACT FACTOR-0.421

SHODHANKAN

21ST CENTURY WORLD : PRESENT SCENARIO & CHALLENGES

EDITOR
Dr. Pandit Nalawade

Scanned by CamScanner

62. CLIMATE CHANGE AND IT'S IMPACT AND CHALLENGES

Dr. Raut Radheshyam Kisanrao, Head and Research Guide
Department of Economics, Sant Ramdas College, Ghansawangi, Dist Jalna.

Introduction

In the last twenty years, the issue of global warming and climate change has become the international political Issue. Changing climatic conditions can have the big effect on our life and environment. Climate change is affecting India in many ways like erratic monsoon, changes in agricultural zones, spread of tropical diseases, sea level rise, availability of fresh water, floods, droughts, hurricanes heat waves, storms, etc. Draughts and floods are destroying especially the crops and harvest of farmers in developing countries like India. Industrialization in the nineteenth and twentieth century stimulated the process of global warming due to excessive CO2-emissions, resulting from the use of fossil fuels like coal and oil. Changing climate is major challenge before the world to cope with the situation the present international political strategy concentrating to stabilize CO2 emissions and trying to balance the environment. This paper is an attempt to study the impact of climate change on poverty.

Climate change: Climate refers to a long-term variation in the atmospheric condition of a specific region or regions and climate change means a gradual change in the climate system both by natural and artificial causes. Climate change is caused by the change in each component of the climate system such as atmosphere, hydrosphere, biosphere, cryosphere and lithosphere

Natural causes: change in solar activity, volcanic eruption, sea water temperature, ice cap distribution, westerly waves and atmospheric waves.
Artificial causes: carbon dioxide emission from industry and agricultural production activities, deforestation, acid rain and the destruction of the ozone layer.

Climate change affects the hydrology including underground water level, water temperature, river flow, and water quality of lakes and marshes, by impacting precipitation, evaporation, and soil moisture content as well as northward movement of plant habitats, changes in animal habitats, rise of ocean temperature, shortened winter and early arrival of spring. It also affecting food production include reduced crop quantity and quality due to the reduced growth period following high levels of temperature rise; reduced sugar content, reduced land fertility, and reduced storage stability in fruits, increase of weeds, and harmful insects in agricultural crops.

The industrial countries are mainly responsible for climate change the poor in the developing countries are most strongly affected by its dangerous impacts. Climate change and poverty are linked by the issue of vulnerability. Poor people are disproportionately Affected not only because they are often more exposed and invariably more vulnerable to climate-related shocks but also because they have fewer resources and receive less support from family, community, the financial system, and even social safety nets to prevent, cope, and adapt.(World Bank report 2015). Poverty is understood as the lack of material plenty, usually equated with lack of income; the inability to satisfy insatiably escalating expectations of access to material goods and services.

A majority of the world's population officially living in poverty depends

Scanned by CamScanner

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad.
In Association with

Chetan Shikshan Prasark Mandal's Vaijapur,
Arts Senior College, Aurangabad.
and
KATHA U. K. (BRITAN)

कथा (यूके)
Katha (UK)

ONE DAY INTERNATIONAL CONFERENCE
On

GLOBAL ENVIRONMENT : ISSUES, CHALLENGES AND SOLUTIONS
(An Interdisciplinary Approach)

29 FEBRUARY 2016

Editor
Dr. Vinod Bairagi

ENGLISH Part - II

Ajanta Prakashan

 ISBN : 978-93-83587-35-3

46 Impact of Climate Change on Agricultural Development in India

Dr. Raut Radheshyam Kisanrao

Head and Research Guide Department of Economics, Sant Ramdas College, Ghansawangi, Dist Jalna.

Introduction

